**बारामती :** तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील डॉ. भगवान माळी यांच्या संशोधनास व्हिएतनाम येथे आयोजिलेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. व्हीएमएस रिसर्च फाउंडेशन, नागपूर व इंडोनेशिया यंग सायंटिस्ट असोसिएशन यांच्यावतीने सहाव्या 'रिसेन्ट ॲडव्हान्सेस इन सायन्स टेक्नॉलॉजी, अँग्रीकल्चर अँड इन्फॉर्मेशन सायन्स' या आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन केले होते. यात डॉ. माळी यांनी क्षारपड जमिनीवरती बारामती परिसर व बारामती तालुक्यात वाढणाऱ्या चांदवेल वनस्पतीवर 'इफेक्ट् ऑफ व्हेरियस कॉन्संट्रेशन्स ऑफ सॉल्ट ऑन जर्मिनेशन अ‍ॅण्ड सिडलिंग ग्रोथ ऑफ पेन्टया ट्रॉफीस निव्हाईलीस' या विषयावर त्यांनी आपले व आरती शेवटे या संशोधक विद्यार्थिनीची संशोधनपत्रिका सादर केली. या सादरीकरणास जांचाय इंग्रापुन (स्टेम एज्युकेशन सेंटर, थायलंड) यांच्या हस्ते प्रथम क्रमांकाचे पारितोषिक देण्यात आले.या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष जवाहर वाघोलीकर, सचिव मिलिंद वाघोलीकर, प्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांनी डॉ. माळी यांचे अभिनंदन केले आहे.

Tuljaram Chaturchand College
Library
Baramati

दै. पुढारी दि. १०/६/२०२३ पान नं. ३

## गोफणे हिची मंडल कृषी अधिकारीपदी निवड



जळोची : बारामतीच्या देसाई इस्टेटमधील गौरी राजेंद्र गोफणे हिची महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या महाराष्ट्र कृषी सेवा परीक्षा २०२१ मधून पहिल्याच प्रयत्नात मंडल कृषी अधिकारी म्हणून निवड झाली आहे. गौरीचे प्राथमिक शिक्षण सोमंथळी (ता. फलटण) येथे व माध्यमिक शिक्षण, मएसो हायस्कूल बारामती येथे झाले. टी. सी. कॉलेज बारामती येथे अकरावी व बारावीचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर बारामती कृषी महाविद्यालयातून पदवीचे शिक्षण व पदव्युत्तर पदवीचे शिक्षण महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी येथून प्रथम श्रेणीत उत्तीर्ण केले. गौरी सध्या महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी येथे पीएचडी करीत आहे. गौरी उत्तम बॅडमिंटनपटू असून, तिने ऑल इंडिया इंटर युनिव्हर्सिटी बॅडमिंटन मॅचेसमध्ये कोटा (राजस्थान), तिरुपती (आंध्र प्रदेश) आणि अकोला येथे राहुरी विद्यापीठाचे प्रतिनिधित्व केले आहे. पदव्युत्तर शिक्षण घेत बारामती येथे झालेल्या इंटरकॉलेज बॅडमिंटन स्पर्धेमध्ये महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरीला गौरीने प्रथमच सुवर्णपदकही मिळवून दिले आहे.

पुढारी १०/६/२३ ३

दैनिक सकाळ दि. १४/६/२०२३ पान नं. ८

## सुजित वाघ यांना पीएच.डी.



सुजित वाघ

बारामती, ता. १३ : येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील सुजित हनुमंत वाघ यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची वनस्पतिशास्त्र विषयातून पीएच.डी. पदवी मिळाली आहे.

सुजित वाघ यांनी स्टडीज ऑन पावडरी मिल्ड्यू फंजाय ऑफ पुणे डिस्ट्रिक्ट, महाराष्ट्र या विषयावर संशोधन केले. तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील डॉ. महादेव कानडे यांनी त्यांना मार्गदर्शन केले. पुणे जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील महत्त्वाच्या पिकावर तसेच जंगली वनस्पतीवर आढळणाऱ्या भुरी रोगग्रस्त ७५ वनस्पतींची नोंद केली. त्यापैकी ११ वनस्पतींची भारतात त्यांनी नव्याने प्रथमच नोंद केली. या संशोधनासाठी त्यांना प्रा. डॉ. यू. ब्राऊन मार्टिन ल्युथर विद्यापीठ, जर्मनी, डॉ. पेड्रोझा, वरिष्ठ संशोधक, संशोधन केंद्र मेक्सिको, तत्कालीन प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर यांचे मार्गदर्शन लाभले. सुजित वाघ यांच्या भुरी रोगावरील संशोधनावरील सहा शोधनिबंध आंतरराष्ट्रीय शोधपत्रिकांमधून प्रकाशित झाले आहेत.

संस्थेचे अध्यक्ष, सचिव जवाहर वाघोलीकर, सचिव मिलिंद वाघोलीकर, प्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांनी त्यांचे अभिनंदन केले.

सकाळ १४/६/२३

Tuljaram Chaturchand College
Library
Baramati

सकाळ दि ०५/०१/२३ पान ६

# टीसी महाविद्यालयात 'युवा संवादा'स प्रतिसाद

**बारामती, ता. ५ :** येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात महसूल सप्ताहानिमित्त युवा संवाद कार्यक्रमाचे आयोजन केले होते. विद्यार्थी विकास मंडळ, राष्ट्रीय सेवा योजना, जिल्हाधिकारी कार्यालय, महसूल शाखा बारामती यांच्या वतीने हा कार्यक्रम घेतला.

याप्रसंगी विद्यार्थ्यांना दहावी-बारावी उत्तीर्ण झाल्यानंतर पुढील शिक्षणासाठी आवश्यक उत्पन्नाचा दाखला, जातीचे प्रमाणपत्र, रहिवासी दाखला या कागदपत्रांची माहिती, शिष्यवृत्तीची माहिती देण्यात आली. बारामतीचे तहसीलदार गणेश शिंदे यांनी युवकांशी संवाद साधला.



**बारामती : विद्यार्थ्यांशी हितगुज साधताना तहसीलदार गणेश शिंदे.**

अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश जगताप होते. गणेश शिंदे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. मूल्याधिष्ठित शिक्षण घेत स्पर्धेला सामोरे जावे, तंत्रज्ञानातील नवीन गोष्टी अवगत करून स्वतःला अद्ययावत ठेवावे असे त्यांनी सांगितले. बारामतीचे गटशिक्षणाधिकारी संपत गावडे यांनी विविध शिष्यवृत्तींबरोबरच दिव्यांग विद्यार्थी शिष्यवृत्ती या योजनांबाबत मार्गदर्शन केले. त्रिंबक ताम्हाणे यांनीही विविध योजनांची माहिती दिली.

प्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांनी विद्यार्थ्यांसाठी नव्याने सुरु केलेल्या उपक्रमांची माहिती दिली. पंचायत समिती, बारामती विस्तार अधिकारी नवनाथ कुचेकर, सागर गायकवाड, अतुल मोरे उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ. सीमा नाईक गोसावी यांनी केले, उपप्राचार्या वैशाली माळी यांनी आभार मानले. राष्ट्रीय सेवा योजनेचे अधिकारी डॉ. विलास कर्डिले यांनी परिश्रम घेतले.

स ५/१/२३ पान ६

पुढारी दि ५/०१/२३ पान ८

# अनेकान्त स्कूलमध्ये 'जेईई', 'नीट' पायाभूत अभ्यासक्रम सुरू

**बारामती : पुढारी वृत्तसेवा**

येथील अनेकान्त एज्युकेशन सोसायटीच्या अनेकान्त इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये 'जेईई', 'नीट' पायाभूत अभ्यासक्रम सुरू करण्यात आल्याची माहिती प्राचार्या डॉ. ऋचा तिवारी-दिवाण यांनी दिली.

'जेईई' आणि 'नीट' या परीक्षांच्या तयारीसाठी नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी हा पायाभूत अभ्यासक्रम वर्ग सुरू करण्यात आला आहे. यामध्ये विद्यार्थ्यांना तज्ज्ञ व अनुभवी प्राध्यापकवर्गाचे मार्गदर्शन लाभणार आहे. त्यांची गणित, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र या विषयांची परिपूर्ण तयारी करून घेतली जाणार आहे. पुढील वर्षी सहावीपासून हा अभ्यासक्रम सुरू केला जाणार आहे. विद्यार्थ्यांच्या अभियांत्रिकी व वैद्यकीय क्षेत्रातील प्रवेशाच्या दृष्टीने हा अभ्यासक्रम उपयुक्त ठरणार आहे. 'विज्ञान शाखेतील शिक्षण आणि करिअरच्या संधी' याविषयी सखोल मार्गदर्शन याद्वारे केले जाणार आहे, अशी माहिती शाळेकडून देण्यात आली.

पुढारी ५/१/२३ ८

Tuljaram Chaturchand College Baramati * Library

दैनिक पुढारी
बुधवार, ९ ऑगस्ट २०२३ ५

# टीसी महाविद्यालयात अवयवदान जनजागृती

९/८/२३
बारामती : पुढारी वृत्तसेवा

बारामती येथील अनेकांत एज्युकेशन सोसायटीच्या तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात अवयवदान जनजागृती अभियान पार पडले. महाविद्यालय व शासनाचे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि सर्वोपचार रुग्णालयाकडून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



**तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात प्रा. सूरज जाधव यांचा सत्कार करण्यात आला.**

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय बारामतीचे भूलशास्त्र विभागातील प्राध्यापक डॉ. सूरज जाधव यांनी 'निरोगी जीवनशैली' या विषयावर व्याख्यान दिले. या प्रसंगी डॉ. जाधव म्हणाले, 'जीवन जगताना निरोगी जीवनशैली महत्त्वाची आहे. आजाराचे ओझे मनुष्याला शारीरिक, मानसिक, सामाजिक, आर्थिक व भावनिकदृष्ट्या परिणाम करते. अल्कोहोल, तंबाखू, धूम्रपान आदी व्यसनांचे शरीरावर दूरगामी परिणाम होतात. नवनवीन गोष्टी आत्मसात करण्यासाठी बुद्धीचा वापर करावा. निरोगी शरीरात निरोगी मन वास करत असते म्हणून निरोगी जीवनशैलीसाठी मन प्रसन्न असावे.'

शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील भूलशास्त्र विभाग प्रमुख डॉ. प्रज्ञा भालेराव यांनी अवयवदान अभियानाबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. समाजसेवा अधीक्षक डॉ. तुषार सावरकर यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना अवयवदानाबद्दलची शपथ दिली. या वेळी डॉ. तुषार साखरे उपस्थित होते.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. प्रास्ताविक कला शाखा अधिष्ठाता डॉ. सीमा नाईक-गोसावी यांनी केले. विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. भगवान माळी यांनी सूत्रसंचालन केले, तर प्राणीशास्त्र विभागप्रमुख प्रा. संदीप चोरडिया यांनी आभार मानले.

सा. न्यायदिनां दि 03/08/2023 पा. 9

# धीरज कुंदन व यशराज गवळी यांनी १०० कि.मी. मॅरेथॉन केली पूर्ण

बारामती-येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्र सेनेचा विद्यार्थी श्री.धीरज कुंदनबंडगर वर्ग एफ.वाय. बी.ए. तसेच श्री. यशराज हनुमंत गवळी वर्ग एफवायबीकॉम मधील विद्यार्थी यांनी रविवार दिनांक २०/०७/२०२३ रोजी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री मा.ना.श्री. अजित दादा पवार यांच्या ६४ व्या वाढदिवसा निमित्त आयोजित बीएसएफ फाउंडेशन आरोग्यवारी मॅरेथॉनमध्ये पुणे ते बारामती १०० कि.मी. रनिंग पूर्ण केली. तेही बारा तासांमध्ये आणि यांची इतिहासात नोंद केली गेली. त्यांनी ही स्पर्धा रविवार सकाळी पहाटे ४.०० वाजता पुण्यातील सारसबाग येथून सुरू करून बारामती येथे संध्याकाळी साडेचार वाजता पूर्ण केली. महाराष्ट्र राज्याचे कृषी मंत्री धनंजय मुंडे तसेच राज्याचे मदत व पुनर्वसनमंत्री अनिल पाटील, मावळचे आमदार सुनील आण्णा शेळके व बारामती सहकारी बँकेचे चेअरमन सचिनशेठ सातव यांनी सत्कार केला आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. त्यांच्या या यशामुळे महाविद्यालयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. त्याबद्दल त्यांचे अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष मा.श्री.जवाहर शहा वाघोलीकर, संस्थेचेसचिव मा.श्री. मिलिंद शहा वाघोलीकर तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश जगताप, रजिस्ट्रार श्री. अभिनंदन शहा, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्यातर्फे विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले.

## किरण शंकर सपकळ एम.पी.एस.सी.परीक्षेत उत्तीर्ण



बारामती - तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती येथील इतिहास विभागाचा विद्यार्थी किरण शंकर सपकळ यांनीएम.पी.एस.सी. परीक्षेत उत्तीर्ण होऊन डेप्युटी एज्युकेशन ऑफिसर या पदावर निवड झाली आहे. तसेच नुकतीच त्यांनी इतिहास विषयातून सेट परीक्षाही उत्तीर्ण केली आहे. किरण सपकळ यांनी अभ्यासामध्ये सातत्य, परिश्रमयामुळे यशश्री खेचून आणली.

पुढारी
बुधवार, २ ऑगस्ट २०२३

## प्रा. शैला जाधव यांना पीएच. डी.



प्रा. डॉ. शैला जाधव

बारामती : अनेकान्त एज्युकेशन सोसायटीच्या येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील गणित विभागातील प्रा. शैला जाधव यांना जेजेटी विद्यापीठ राजस्थान यांनी नुकतीच पीएच.डी. पदवी प्रदान केली. जेजेटी युनिव्हर्सिटी राजस्थान येथील डॉ. विनिता बसोटिया यांनी शोधनिर्देशक म्हणून, तर विद्या प्रतिष्ठान कमलनयन बजाज इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी बारामती येथील डॉ. ए. पी. हिवरेकर यांनी सहशोधनिर्देशक म्हणून त्यांना मार्गदर्शन केले. प्रा. जाधव या तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात गणित विभागात गेल्या १३ वर्षांपासून अध्यापन करीत आहेत. त्यांनी बीएस्सी व बीएस्सी कॉम्प्युटर सायन्स या वर्गांकरिता दोन पुस्तके प्रकाशित केली आहेत. प्रा. डॉ. जाधव यांच्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष जवाहर शाह (वाघोलीकर), सचिव मिलिंद शाह (वाघोलीकर), महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश जगताप, उपप्राचार्य, रजिस्ट्रार, प्राध्यापक-शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी त्यांचे अभिनंदन केले.

Tuljaram Chaturchand College
Library
Baramati

दै. पुण्यनगरी

बुधवार, ९ ऑगस्ट २०२३ । पुणे 3

# टी. सी. कॉलेजला पुणे विद्यापीठाचे दहा पुरस्कार

**❑ बारामतीतील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या प्राध्यापक व विद्यार्थ्यांचा विद्यापीठाकडून पारितोषिक देऊन सन्मान**



**। बारामती : प्रतिनिधी**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाला उत्कृष्ट महाविद्यालय, उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी, उत्कृष्ट संघनायक, उत्कृष्ट स्वयंसेवक, उत्कृष्ट शिबिर सहभाग असे एकूण १० पुरस्कार देण्यात आले.

नुकत्याच पार पडलेल्या कार्यक्रमात पुरस्कार प्रदान करण्यात आले. या वेळी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, व्यवस्थापन परिषद सदस्या बागेश्री मंथाळकर, प्रा. डॉ. नितीन घोरपडे शिंगणापूरकर, प्रा. डॉ. वायदंडे, प्रसन्नजीत फडणवीस, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. सदानंद भोसले, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. अभिजित कुलकर्णी, रासेयोचे संचालक डॉ. प्रभाकर देसाई यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले.

राष्ट्रीय सेवा योजनेतील उत्कृष्ट कार्याबद्दल विद्यापीठाच्या वतीने राष्ट्रीय सेवा योजना दरवर्षी राष्ट्रीय सेवा योजनेंतर्गत विद्यापीठ व जिल्हास्तरावर पुरस्कार दिले जातात. महाविद्यालयाचे प्रा. डॉ. अविनाश जगताप यांना उत्कृष्ट महाविद्यालयाचा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. डॉ. विलास कर्डिले यांना उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी विद्यापीठस्तरीय वर्ष २०१८-१९ व उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी राज्यस्तरीय वर्ष २०२०-२१ असे दोन पुरस्कार, उत्कृष्ट जिल्हा समन्वयक वर्ष २०१९-२० व उत्कृष्ट संघनायक, राज्यस्तरीय साहसी क्रीडा शिबिर चिखलदरा, पुणे ते पंढरपूर राज्यस्तरीय पायी वारी असे दोन पुरस्कार अशा पाच पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. डॉ. भगवान माळी यांना कोल्हापूर पूर आपत्ती निवारण शिबिरामध्ये २०१९ मध्ये सहभाग घेतल्याबद्दल सन्मानित करण्यात आले. महाविद्यालयातील कु. गणेश दडस उत्कृष्ट स्वयंसेवक व कु. गंधाली भट उत्कर्ष शिबिर सहभाग या विद्यार्थ्यांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष जवाहर शाह व सचिव मिलिंद शाह, संस्थेचे सर्व सदस्य व महाविद्यालयाचे रजिस्ट्रार, प्राध्यापकांनी पुरस्कार विजेत्यांचे अभिनंदन केले.

दै. पुण्यनगरी ९/८/२३ 3

Chaturchand Coll
Library

लोकमत
epaper.lokmat.com
पुणे, गुरुवार, दि. १० ऑगस्ट २०२३ ४



सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वतीने 'टी.सी. महाविद्यालयाला'१० पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे 'टी. सी. महाविद्यालयाला' १० पुरस्कार

## पुण्यातील कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार प्रदान

१०।८।२३ ४

लोकमत न्यूज नेटवर्क

बारामती : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाला उत्कृष्ट महाविद्यालय, उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी, उत्कृष्ट संघनायक, उत्कृष्ट स्वयंसेवक, उत्कृष्ट शिबिर सहभाग असे एकूण १० पुरस्कार देण्यात आले. विद्यापीठात नुकत्याच पार पडलेल्या कार्यक्रमात हे पुरस्कार प्रदान करण्यात आले. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, व्यवस्थापन परिषद सदस्या बागेश्री मंथाळकर, प्राचार्य डॉ. नितीन घोरपडे आदींच्या हस्ते सन्मानपूर्वक हे पुरस्कार प्रदान करण्यात आले.

### विद्यार्थ्यांसह शिक्षकांनीही उमटवला ठसा

महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. अविनाश जगताप यांना उत्कृष्ट महाविद्यालयाचा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. डॉ. विलास कर्डिले यांना उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी विद्यापीठस्तरीय वर्ष २०१८-१९ आणि उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी राज्यस्तरीय वर्ष २०२०-२१ असे दोन पुरस्कार, उत्कृष्ट जिल्हा समन्वयक वर्ष २०१९-२० तसेच उत्कृष्ट संघनायक, राज्यस्तरीय सहासी क्रीडा शिबिर चिखलदरा, पुणे ते पंढरपूर राज्यस्तरीय पायी वारी असे दोन पुरस्कार अशा एकूण पाच पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. डॉ. भगवान माळी यांना कोल्हापूर पूर आपत्ती निवारण शिबिरामध्ये वर्ष २०१९ मध्ये सहभाग घेतल्याबद्दल सन्मानित करण्यात आले. महाविद्यालयातील गणेश दडस उत्कृष्ट स्वयंसेवक आणि गंधाली भट उत्कर्ष शिबिर सहभाग या विद्यार्थ्यांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष जवाहर शाह वाघोलीकर, सचिव मिलिंद शाह वाघोलीकर संस्थेचे सर्व सदस्य तसेच महाविद्यालयाचे रजिस्ट्रार आणि प्राध्यापक यांनी पुरस्कार मिळाल्याबद्दल सर्वांचे विशेष अभिनंदन केले.

पान ८
दै. पुढारी दि. ३/५/२३

## किरण सपकाळ एमपीएससी उत्तीर्ण

३/५/२३ ८

**बारामती : पुढारी वृत्तसेवा**



बारामती येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील इतिहास विभागाचा विद्यार्थी किरण शंकर सपकळ याने एमपीएससी परीक्षेत यश मिळविले. शिक्षण विभागात उपशिक्षणाधिकारी म्हणून त्याची निवड झाली आहे. किरण सपकळ यांनी नुकतीच इतिहास विषयातून सेट परीक्षाही उत्तीर्ण केली आहे. सपकळ यांनी अभ्यासामध्ये सातत्य, परिश्रमामुळे यशश्री खेचून आणली. त्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष जवाहर शाह वाघोलीकर, सचिव मिलिंद शाह वाघोलीकर, प्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांनी सपकळ यांचे अभिनंदन केले.

पुढारी ३/५/२३ ८

दै. लोकमत दि ३/५/२३ पान ५

३/५/२३ पान ५

## प्रा. शैला जाधव यांना पीएच. डी प्रदान

**लोकमत न्यूज नेटवर्क**

**बारामती :** तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील गणित विभागातील प्रा.शैला जाधव यांना राजस्थान येथील जेजेटी विद्यापीठाच्या



वतीने नुकतीच पीएच.डी पदवी प्रदान केली आहे.

त्यांच्या पीएच.डी प्रबंधाचा विषय 'मल्टिपल इंटीग्रल ट्रान्सफॉर्म ॲण्ड देअर ॲप्लिकेशन्स' हा विषय होता. 'जेजेटी'च्या डॉ.विनिता बसोटीया यांनी शोधनिर्देशक म्हणून तर विद्या प्रतिष्ठान कमलनयन बजाज इन्स्टिट्युट ऑफ इंजिनीअरिंग ॲन्ड टेक्नॉलॉजी येथील डॉ.ए.पी. हिवरेकर यांनी त्यांना मार्गदर्शन केले. प्रा. डॉ. जाधव यांच्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष जवाहर शाह (वाघोलीकर), सचिव मिलिंद शाह (वाघोलीकर), महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश जगताप, उपप्राचार्य, रजिस्ट्रार, प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.



**बारामती :** फोटोग्राफी प्रदर्शनाचे उद्‌घाटन करताना महेश रोकडे, डॉ. अविनाश जगताप आणि मान्यवर.

# बारामतीत टीसी महाविद्यालयात फोटोग्राफी प्रदर्शनाला प्रतिसाद

**बारामती, ता. २६ :** येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात मीडिया अँड कम्युनिकेशन स्टडीज विभाग आणि बारामती नगरपरिषद बारामती यांच्यावतीने "थ्रू द फ्रेम्स" फोटोग्राफी स्पर्धा आणि प्रदर्शन आयोजित केले होते.

जागतिक छायाचित्र दिनानिमित्त आयोजित केलेल्या या प्रदर्शनास भारतभरातून चांगला प्रतिसाद मिळाला. पीपल, प्लेस, नेचर आणि स्वच्छ, सुंदर बारामती या विषयावर आधारित तीनशेहून अधिक फोटोंचे प्रदर्शन आयोजित केले गेले.

स्पर्धेचे परीक्षण संदीप तावरे यांनी केले. तर उद्घाटन नगरपालिकेचे मुख्याधिकारी महेश रोकडे आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अविनाश जगताप यांनी केले. आरोग्यनिरीक्षक राजेंद्र सोनवणे, अक्षय नाईक, उपप्राचार्य डॉ.अशोक काळंगे, डॉ.सचिन गाडेकर, डॉ. योगिनी मुळे, रजिस्ट्रार अभिनंदन शहा, राहुल चौधरी, रणजित पंडित, गायत्री नंदकुमार, ऋतुजा आगम आदी उपस्थित होते. संस्थेचे अध्यक्ष जवाहर वाघोलीकर, सचिव मिलिंद, वाघोलीकर यांनी मार्गदर्शन केले.

**स्पर्धेचा निकाल :** 'स्वच्छ बारामती, सुंदर बारामती'- स्वराज कांबळे, केदार किर्वे, वैभव गायकवाड. 'प्लेस'- साक्षी जाधव, ऋषिकेश वाघमारे. पीपल- प्रथमेश मगदूम, आशय चिट्टे, अक्षय सोनावणे 'नेचर'- आर्या टिळेकर, भूषण भोये, सौरभ घाडगे

# 'टीसी' महाविद्यालयात भित्तिपत्रकाचे उद्‌घाटन

**बारामती, ता. २६ :** तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या मराठी वाङमय मंडळ व अस्मिता भित्तिपत्रकाचे उद्‌घाटन अभिनेते प्रदीप कोथमिरे यांच्या हस्ते झाले.

या प्रसंगी प्राचार्य डॉ. अविनाश जगताप उपस्थित होते. या वेळी कोथमिरे, डॉ. जगताप यांनी मनोगत व्यक्त केले. आपल्या अभिनय क्षेत्राचा प्रवास महाविद्यालय आणि बारामतीशी असलेला ऋणानुबंध यांची माहिती कोथमिरे यांनी दिली. त्यांनी विविध अनुभव विद्यार्थ्यांना सांगितले. प्रास्ताविक डॉ. सीमा नाईक-गोसावी यांनी केले. डॉ. मुक्ता आंभेरे यांनी परिचय करून दिला. डॉ. सुनील खामगळ यांनी सूत्रसंचालन तर डॉ. प्रतिभा जावळे यांनी आभार मानले.

# तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात महसूल सप्ताहानिमित्त युवा संवाद आयोजित

**बारामती :** तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात महसूल सप्ताहा निमित्त युवा संवाद व विद्यार्थी विकास मंडळ, राष्ट्रीय सेवा योजना व जिल्हाधिकारी कार्यालय, महसूल शाखा बारामती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित युवा संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांना दहावी-बारावी उत्तीर्ण झाल्यानंतर पुढील शिक्षणासाठी आवश्यक असणाऱ्या उत्पन्नाचा दाखला, जातीचे प्रमाणपत्र, रहिवाशी दाखल इ. कागदपत्रांची माहिती, शिष्यवृत्तीची माहिती देण्यात आली.

बारामतीचे तहसीलदार गणेश शिंदे यांनी युवकांशी संवाद साधला. अध्यक्षस्थानी डॉ.अविनाश जगताप होते. विद्यार्थ्यांशी बोलताना गणेश



शिंदे यांनी सध्याचे युग हे स्पर्धेचे युग आहे. विद्यार्थ्यांनी कठोर परिश्रमाची तयारी ठेवावी. चांगल्या मित्रांची संगत ठेवावी. अधिकाधिक शिक्षणाचे ध्येय बाळगावे. आई वडील व शिक्षकांप्रती आदर बाळगावा- मूल्याधिष्ठित शिक्षण घ्यावे व स्पर्धेला सामोरे जावे. तंत्रज्ञानातील नवनवीन गोष्टी अवगत करून स्वतःला अद्ययावत ठेवावे असे बहुमोल मार्गदर्शन केले.

बारामतीचे गटशिक्षणाधिकारी संपत गावडे यांनी विविध शिष्यवृत्ती व दिव्यांग विद्यार्थी शिष्यवृत्ती योजना इ. बाबत मार्गदर्शन केले. त्रिंबक ताम्हाणे यांनीही विविध योजनांची माहिती दिली. अध्यक्षीय मनोगतातून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अविनाश जगताप यांनी विद्यार्थ्यांसाठी नव्याने सुरु केलेल्या उपक्रमांची माहिती दिली.

बारामती पंचायत समिती विस्तारअधिकारी नवनाथ कुचेकर, सागर गायकवाड,शालेय पोषण आहार योजना,अधिक्षक अतुल मोरे हे मान्यवर उपस्थित होते.

स्वागत व प्रास्ताविक महाविद्यालयाच्या कला शाखा अधिष्ठाता डॉ.सीमा नाईक गोसावी यांनी केले तर आभार कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्या प्रा.वैशाली माळी यांनी मानले. राष्ट्रीय सेवा योजनेचे अधिकारी डॉ.विलास कर्डीले यांनी विशेष परिश्रम घेतले. ५०० विद्यार्थ्यांनी कार्यक्रमात सहभाग घेतला.

दैनिक सकाळ पान ४

पुणे जिल्हा पुणे, बुधवार, ९ ऑगस्ट २०२३



**पुणे :** पुरस्कार स्वीकारताना टीसी महाविद्यालयाचा संघ.

# तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयास दहा पुरस्कार

**बारामती, ता. ८ :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाकडून तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयास नुकतेच उत्कृष्ट महाविद्यालय, उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी, उत्कृष्ट संघनायक, उत्कृष्ट स्वयंसेवक, उत्कृष्ट शिबिर सहभाग असे एकूण दहा पुरस्कार प्रदान केले आहेत.

या वेळी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार यांच्यासह इतर मान्यवरांनी पुरस्कार प्रदान केले. प्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांना उत्कृष्ट महाविद्यालय, डॉ. विलास कर्डिले यांना उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी, विद्यापीठस्तरीय वर्ष २०१८-१९ उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी, राज्यस्तरीय वर्ष २०२०-२१ असे दोन पुरस्कार, उत्कृष्ट जिल्हा समन्वयक वर्ष २०१९-२० तसेच उत्कृष्ट संघनायक, राज्यस्तरीय साहसी क्रीडा शिबिर चिखलदरा, पुणे ते पंढरपूर राज्यस्तरीय पायी वारी असे दोन पुरस्कार, अशा विविध पुरस्कारांनी सन्मानित केले.

डॉ. भगवान माळी यांना कोल्हापूर पूर आपत्ती निवारण शिबिरामध्ये २०१९ मध्ये सहभाग घेतल्याबद्दल महाविद्यालयातील गणेश दडस यांना उत्कृष्ट स्वयंसेवक, तर गंधाली भट हिला उत्कर्ष शिबिर सहभाग असा पुरस्कार दिला.

सा. सत्य समीक्षा दि. 13/8/23 पान 3

# किरण सपकळ एम.पी.एस.सी.परीक्षेत उत्तीर्ण

**बारामती :** येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील इतिहास विभागाचा विद्यार्थी किरण शंकर सपकळ यांनी एम. पी. एस. सी. परीक्षेत उत्तीर्ण होऊन डेप्युटी एज्युकेशन ऑफिसर या पदावर निवड झाली आहे. तसेच नुकतीच त्यांनी इतिहास विषयातून सेट परीक्षाही उत्तीर्ण केली आहे. किरण सपकळ यांनी अभ्यासामध्ये सातत्य,परिश्रम यामुळे यशश्री खेचून आणली. त्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष जवाहर शाह वाघोलीकर, सचिव मिलिंद शाह वाघोलीकर,प्राचार्यडॉ.अविनाश जगताप,सर्व उपप्राचार्य, रजिस्ट्रार, प्राध्यापक शिक्षक,सर्व विद्यार्थी विद्यार्थिनी यांनी किरण सपकळ यांचे अभिनंदन केले आहे.



किरण सपकळ

# तु.च.महाविद्यालयातील प्रा.शैला जाधव यांना पीएच.डी.प्रदान

**बारामती :** तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील गणित विभागातील प्रा.शैला जाधव यांना जेजेटी विद्यापीठ,राजस्थान यांनी नुकतीच पीएच.डी. पदवी प्रदान केली आहे. त्यांच्या पीएच.डी. प्रबंधाचा विषय **"Multiple Integral Transform and their applications'** असा होता.

जेजेटी युनिव्हर्सिटी राजस्थान येथील डॉ.विनिता बसोटीया यांनी शोधनिर्देशक म्हणून तर विद्या प्रतिष्ठान कमलनयन बजाज इन्स्टीटयूट ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, बारामती येथील डॉ.हिवरेकर ए.पी.यांनी सहशोध निर्देशक म्हणून त्यांना मार्गदर्शन केले.



प्रा.शैला जाधव । या तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात गणित विभागात गेल्या १३ वर्षापासून अध्यापन करीत आहेत. त्यांनी बीएस्सी व बी.एस्सी.कॉम्प्युटर सायन्स या वर्गांकरिता दोन पुस्तके प्रकाशित केली आहेत. तसेच त्यांनी राष्ट्रीय व राज्य स्तरावरील विविध परिषदांमध्ये सहभागी होवून संशोधन प्रबंध सादर केलेले आहेत.

प्रा.डॉ.शैला जाधव यांच्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष जवाहर शाह (वाघोलीकर),सचिव मिलिंद शाह (वाघोलीकर), महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अविनाश जगताप,उपप्राचार्य, रजिस्ट्रार, प्राध्यापक-शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

सा. सत्य समीक्षा 13/8/23 पान 3

# सामाजिक बांधिलकी जपणे गरजेचे : कोथमिरे

■ **टी. सी. महाविद्यालयात अस्मिता भित्तिपत्रकाचे उद्घाटन**

२५/१०/२३

**बारामती : पुढारी वृत्तसेवा**

'समाजातील संस्कारांतून कलाकाराची जडणघडण होते. त्यामुळे कलाकाराने सामाजिक बांधिलकी जपली पाहिजे. त्याचे वर्तन समाजासाठी पूरक असले पाहिजे,' असे उद्गार अभिनेते प्रदीप कोथमिरे यांनी काढले.

तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या मराठी वाङ्मय मंडळ व अस्मिता भित्तिपत्रकाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अविनाश जगताप होते.



**टी. सी. महाविद्यालयात अस्मिता भित्तिपत्रकाचे उद्घाटन करताना मान्यवर.**

कोथमिरे म्हणाले, 'नटाचा अभिनय वाचनाने समृद्ध होतो. त्यामुळे विद्यार्थिदशेतच वाचनाची सवय असणे गरजेचे आहे. अस्मिता भित्तिपत्रक हे विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देणारे एक महत्त्वाचे व्यासपीठ आहे. भित्तिपत्रकाच्या माध्यमातून अनेक कवी, लेखक व चित्रकार निर्माण झाले आहेत,' असे सांगून त्यांचा भित्तिपत्रकापासून सुरू झालेला अभिनयाक्षेत्रातील प्रवास उलगडला. विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना त्यांनी उत्तरे दिली.

डॉ. जगताप यांनी अध्यक्षीय भाषणात, 'बारामतीला कलेची परंपरा आहे. बारामतीमध्ये पूर्वी अनेक कलाकारांचा अगदी सहज वावर होता,' असे सांगत बारामतीच्या सांस्कृतिक परंपरेची ओळख करून दिली.

प्रास्ताविक मराठी विभागप्रमुख डॉ. सीमा नाईक-गोसावी यांनी केले. अस्मिता भित्तिपत्रकाच्या प्रमुख डॉ. मुक्ता आंभेरे यांनी परिचय करून दिला. सूत्रसंचालन डॉ. सुनील खामगळ यांनी केले. डॉ. प्रतिभा जावळे यांनी आभार मानले.

पुणारी दि २०।४।२३ पान २

# बारामती बसस्थानक ते टी. सी. कॉलेज बससेवा सुरू

**बारामती :** बारामती येथील स्थलांतरित बसस्थानक ते तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या प्रवासा-दरम्यान विद्यार्थ्यांची गैरसोय होत होती. हे टाळण्यासाठी बससेवा सुरू करण्याची मागणी गेल्या दोन वर्षांपासून विद्यार्थ्यांकडून होती. या मागणीला यश आले आहे. या मार्गावर बारामती आगाराकडून नुकतीच बससेवा सुरू करण्यात आली.

बसस्थानक ते टी. सी. महाविद्यालय हे अंतर सुमारे चार ते पाच किलोमीटर आहे. बसस्थानक सध्या कसब्यात तात्पुरत्या स्वरूपात स्थलांतरित करण्यात आले आहे. तेथून पायपीट करणे विद्यार्थ्यांसाठी जिकिरीचे ठरत होते.



टी. सी. महाविद्यालय ते बसस्थानक अशी बससेवा सुरू करण्यात आली.

महाविद्यालयाच्या मार्गदर्शनाखाली प्रीतम गुळूमकर आणि शुभम सावंत यांनी सातत्याने पाठपुरवठा करून उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे बस सुरू करण्याची मागणी केली होती. त्यानुसार बस सुरू करण्यात आली. बससेवेचा शुभारंभ करताना बारामती बँकेचे अध्यक्ष सचिन सातव, माजी नगराध्यक्षा पौर्णिमा तावरे, प्राचार्य डॉ. अविनाश जगताप, उपप्राचार्य डॉ. सचिन गाडेकर, डॉ. अशोक काळंगे, डॉ. योगिनी मुळे, डॉ. सीमा नाईक गोसावी, डॉ. रामचंद्र सपकाळ, रजिस्ट्रार अभिनंदन शहा, रसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ. संजय काळे, युवा उद्योजक शुभम सावंत, योगेश नालंदे आदींची उपस्थिती होती.

पुणारी २०।४।२३ २

दै. सकाळ
22/1/23 पान ५

## टीसी महाविद्यालयाच्या १९ खेळाडूंना शिष्यवृत्ती

**बारामती, ता. २१ :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाच्या वतीने विविध क्रीडा स्पर्धांमध्ये नैपुण्य प्राप्त केलेल्या खेळाडूंना दर वर्षी क्रीडा शिष्यवृत्ती देण्यात येते. शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ करिता तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील १९ खेळाडूंना ही शिष्यवृत्ती प्राप्त झाली आहे.

अखिल भारतीय आंतर विद्यापीठ व तिसऱ्या खेलो इंडिया विद्यापीठ स्पर्धेत प्रतिनिधित्व करणाऱ्या सांघिक क्रीडा प्रकारामध्ये नैपुण्य प्राप्त प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक संपादन केलेल्या विविध संघातील खेळाडूंना, तसेच राज्यपाल यांच्या प्रेरणेने आयोजित कृषी व अकृषी विद्यापीठ अंतर्गत क्रीडा महोत्सव स्पर्धांमध्ये प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक संपादन केलेल्या विविध संघातील खेळाडूंना ही शिष्यवृत्ती दिली जाणार आहे. तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील १९ खेळाडूंना दीड लाखाहून अधिक रक्कम शिष्यवृत्ती म्हणून प्राप्त झाली आहे. या शिष्यवृत्तीमुळे खेळाडूंना खेळासाठी प्रोत्साहन मिळेल असे प्रा. डॉ. अविनाश जगताप यांनी सांगितले.


## टीसी महाविद्यालयाच्या १९ खेळाडूंना शिष्यवृत्ती

**बारामती, ता. २१ :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाच्या वतीने विविध क्रीडा स्पर्धांमध्ये नैपुण्य प्राप्त केलेल्या खेळाडूंना दर वर्षी क्रीडा शिष्यवृत्ती देण्यात येते. शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ करिता तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील १९ खेळाडूंना ही शिष्यवृत्ती प्राप्त झाली आहे.

अखिल भारतीय आंतर विद्यापीठ व तिसऱ्या खेलो इंडिया विद्यापीठ स्पर्धेत प्रतिनिधित्व करणाऱ्या सांघिक क्रीडा प्रकारामध्ये नैपुण्य प्राप्त प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक संपादन केलेल्या विविध संघातील खेळाडूंना, तसेच राज्यपाल यांच्या प्रेरणेने आयोजित कृषी व अकृषी विद्यापीठ अंतर्गत क्रीडा महोत्सव स्पर्धांमध्ये प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक संपादन केलेल्या विविध संघातील खेळाडूंना ही शिष्यवृत्ती दिली जाणार आहे. तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील १९ खेळाडूंना दीड लाखाहून अधिक रक्कम शिष्यवृत्ती म्हणून प्राप्त झाली आहे. या शिष्यवृत्तीमुळे खेळाडूंना खेळासाठी प्रोत्साहन मिळेल असे प्रा. डॉ. अविनाश जगताप यांनी सांगितले.


सकाळ 22/1/23 ४

दै. पुढारी दि. २२/०७/२३ पान ५

# ध्येय ठेवून वाटचाल केल्यास यश निश्चित : इंगळे

२२/७/२३

बारामती : पुढारी वृत्तसेवा

विद्यार्थी जीवनात ध्येय डोळ्यापुढे ठेवत वाटचाल केल्यास यश नक्की मिळते, असे मत उपविभागीय पोलिस अधिकारी गणेश इंगळे यांनी व्यक्त केले.



**अनेकान्त एज्युकेशन सोसायटीच्या वतीने उपविभागीय पोलिस अधिकारी गणेश इंगळे यांचा सत्कार करण्यात आला.**

अनेकान्त एज्युकेशन सोसायटीच्या वसतिगृह समितीच्या वतीने वसतिगृहातील विद्यार्थ्यांसाठी आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या जीवराज सभागृहात हा कार्यक्रम पार पडला. अध्यक्षस्थानी वसतिगृहाचे अध्यक्ष डॉ. जयप्रकाश शहा होते. प्राचार्य डॉ. अविनाश जगताप, उपप्राचार्या वैशाली माळी, संगीता शहा- वाघोलीकर, तनुजा शहा- लेंगरेकर, शुभांगी कोठारी, संस्थेचे रजिस्ट्रार वि. दि. महामुनी आदी या वेळी उपस्थित होते.

इंगळे म्हणाले, पालकांनी आपल्या पाल्यासाठी काही स्वप्ने पाहिलेली असतात. तुम्ही इथे घडण्यासाठी आला आहात बिघडण्यासाठी नाही.

घरच्यांशी सुसंवाद ठेवावा. न्यूनगंड ठेवू नये. प्रत्येकाचे एक स्वतंत्र व्यक्तिमत्त्व असते. एखादी गोष्ट मनात ठेवू नका, बोलते व्हा. छंद जोपासा. त्यामुळे ध्येयाकडे लवकर पोहोचू शकाल. तणावमुक्त जगा. आभासी जगात वावरू नका. मोबाईलच्या आहारी जाऊ नका. मुलींना कोणी त्रास देत असेल तर त्यांनी निर्भयपणे पुढे येत तक्रारी द्यावी. प्रास्ताविक प्राचार्या डॉ. अविनाश जगताप यांनी केले. सूत्रसंचालन आकाश जाधव, समृद्धी नीळ यांनी केले. उपप्राचार्या वैशाली माळी यांनी आभार मानले.

epaper.lokmat.com
पुणे, बुधवार, दि. ६ सप्टेंबर २०२३ ७
लोकमत

# 'टीसी'च्या प्रणवची भारतीय संघात निवड

लोकमत न्यूज नेटवर्क

**बारामती :** चायनीज तायपे येथे आयोजित आय. के. एफ. जागतिक अजिंक्यपद कॉर्फबॉल स्पर्धेसाठी तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाचा विद्यार्थी प्रणव पोमणे याची भारतीय संघात निवड झाली आहे.

निवड झालेल्या भारतीय संघाच्या स्पर्धा पूर्व प्रशिक्षण शिबिर लव्हली प्रोफेशनल युनिव्हर्सिटी फगवारा या ठिकाणी दिनांक १३ सप्टेंबर २०२३ ते २४ सप्टेंबरदरम्यान होणार आहे. प्रणव याला चायनीज तायपे येथील स्पर्धेकरिता संस्था व महाविद्यालयातर्फे रक्कम रुपये ५०,०००/- आर्थिक साहाय्य संस्थेचे सन्माननीय ज्येष्ठ सदस्य विकास शहा लेंगरेकर यांच्या हस्ते देण्यात आले. प्रणव यास जिमखाना विभागाचे प्रमुख व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. गौतम जाधव व प्रा. अशोक देवकर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. प्रणव याच्या निवडीबद्दल संस्थेचे अध्यक्ष जवाहर शाह वाघोलीकर व सचिव मिलिंद शाह वाघोलीकर, ज्येष्ठ सदस्य विकास शहा लेंगरेकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश जगताप, उपप्राचार्य, रजिस्ट्रार आदींनी अभिनंदन केले.



जागतिक अजिंक्यपद कॉर्फबॉल स्पर्धेसाठी तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाचा विद्यार्थी प्रणव पोमणे याची भारतीय संघात निवड झाल्याबद्दल त्याला सन्मानित करण्यात आले..

दैनिक पुढारी

दिनांक : शुक्रवार, १५ सप्टेंबर २०२३ पान ५ (दिल्या.)

# बारामतीत कविवर्य मोरोपंत वक्तृत्व, वादविवाद स्पर्धा

**बारामती : पुढारी वृत्तसेवा**

येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय व बारामती नगरपरिषद यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात दि. ५ व ६ ऑक्टोबर रोजी कविवर्य मोरोपंत राज्यस्तरीय वक्तृत्व व वादविवाद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालय अशा दोन गटांत ही स्पर्धा पार पडणार आहे. स्पर्धेत वादविवादासाठी 'सद्यकालीन राजकीय परिस्थिती लोकशाहीस मारक आहे, हा विषय देण्यात आला आहे. कनिष्ठ महाविद्यालयात वक्तृत्व स्पर्धेसाठी 'डिजिटल युगातील हरवलेले बालपण', 'प्रेम, नकार आणि हिंसा', 'आर्या मयूरपंतांची', 'माझ्या कल्पनेतील समृद्ध महाराष्ट्र', 'महाविद्यालय-संस्कार केंद्र की परीक्षा केंद्र?' आणि 'जैन आहार विहार आणि आजचे डाएट' हे सहा विषय देण्यात आले आहेत.

वरिष्ठ महाविद्यालय गटासाठी 'रानकवी ना. धों. महानोर', 'कृत्रिम बुद्धिमत्ता एक आव्हान', 'अस्वस्थ भारत : लोकशाही मूल्यांचा ऱ्हास', 'मोरोपंतांच्या काव्यातील रचना सौंदर्य', 'भारत एक उद्योन्मुख महासत्ता', 'समाजमाध्यमे आणि विचार स्वातंत्र्' व 'अनेकान्तवाद सद्यःकालीन उपयुक्तता' हे सात विषय देण्यात आले आहेत.

विजेत्यांना चषकासह ५० हजार रुपयांहून अधिक रकमेची रोख बक्षिसे दिली जाणार आहेत. बारामतीमधील ही स्पर्धा राज्यातील नामांकित समजली जाते. या स्पर्धेने अनेक चांगले वक्ते, समाजसेवक, राजकारण, चित्रपट, शिक्षण, नाट्य, वकील, पत्रकार, विचारवंत दिले आहेत. आजवरच्या या स्पर्धेच्या विजेत्यांमध्ये अविनाश धर्माधिकारी, डॉ. अरुणा ढेरे, समीरन वाळवेकर, अभिराम भडकमकर, परेश मोकाशी, माधुरी दीक्षित, भक्ती हुबळीकर, प्रदीप टिल्लू या मान्यवरांचा सहभाग राहिला आहे.

या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी स्पर्धकांनी www.tccollege.org/moropant या संकेतस्थळाला भेट द्यावी, असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश जगताप, कार्याध्यक्ष प्रा. कृष्णा कुलकर्णी यांनी केले आहे.

# बारामतीच्या उपेंद्र चौधरी यांना पीएच.डी. प्रदान

**बारामती, ता. २३ :** येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील संगणकशास्त्र विभागातील उपेंद्र चौधरी यांना नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने संगणकशास्त्र विषयात पीएच. डी पदवी प्रदान केली आहे.

'अ स्टडी ऑफ आयसीटी टूल्स विथ रिस्पेक्ट टू लर्नर्स अचिव्हमेंट युझिंग इव्हॉल्युशनरी अल्गोरिदम बेस्ड टेक्निक्स' असा त्यांच्या प्रबंधाचा विषय होता. डॉ. सुधीर जगताप यांनी त्यांना मार्गदर्शन केले. पुणे जिल्ह्यातील शाळेतील आयसीटी टूल्सचा वापर, असलेल्या सुविधा, येणाऱ्या त्रुटी यांची शिक्षक व मुख्याध्यापकांकडून माहिती संकलन करीत, त्याचे विश्लेषण करून संगणक विषयातील इव्हॉल्यूशनरी अल्गोरिदमचा वापर करून चौधरी यांनी विविध निष्कर्ष काढले.

चौधरी हे तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात संगणकशास्त्र विभागात २५ वर्षांपासून अध्यापन करीत आहेत.

# प्रा. उपेंद्र चौधरी यांना पीएच. डी. प्रदान



**बारामती :** तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील संगणकशास्त्र विभागातील प्रा. उपेंद्र चौधरी यांना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांनी नुकतीच संगणकशास्त्र विषयात विषयात पीएच.डी. पदवी प्रदान केली आहे. त्यांच्या पीएच.डी. प्रबंधाचा विषय 'अ स्टडी ऑफ आयसीटी टूल्स विथ रिस्पेक्ट टू लर्नर्स अचिव्हमेंट युझिंग इव्हॉल्युशनरी अल्गोरिदम बेस्ड टेक्निक्स' असा होता. स्वामी विवेकानंद महाविद्यालय, उदगीर (जि. लातूर)चे प्राचार्य डॉ. सुधीर बी. जगताप यांनी शोधनिर्देशक म्हणून त्यांना मार्गदर्शन केले. प्रा. चौधरी हे तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात संगणकशास्त्र विभागात गेल्या २५ वर्षांपासून अध्यापन करीत असून, गेल्या आठ वर्षांपासून संगणकशास्त्र विभागप्रमुख म्हणून काम करीत आहेत. त्यांनी राष्ट्रीय व राज्यस्तरावरील विविध परिषदांमध्ये सहभागी होऊन संशोधन प्रबंध सादर केले आहेत. प्रा. डॉ. उपेंद्र चौधरी यांच्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष जवाहर शाह (वाघोलीकर), सचिव मिलिंद शाह (वाघोलीकर), महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश जगताप, उपप्राचार्य, रजिस्ट्रार, प्राध्यापक-शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी त्यांचे अभिनंदन केले.



**बारामती : पुरुषोत्तम करंडकात उत्तेजनार्थ पारितोषिक विजेते कलाकार आणि मार्गदर्शक प्राध्यापक.**

## टीसी महाविद्यालयास 'पुरुषोत्तम'मध्ये उत्तेजनार्थ

बारामती : महाराष्ट्रीय कलोपासक संस्था आयोजित पुरुषोत्तम करंडक स्पर्धेत तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या पिंपळपान एकांकिकेस उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले. याच एकांकिकेतील लक्ष्मीचे पात्र साकारणाऱ्या तृप्ती जाधव हिला देखील अभिनयाचे उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले. 'पिंपळपान' एकांकिकेमध्ये गावाकडील एक गोष्ट साकारण्याचा प्रयत्न लेखक निरंजन घुगे यांनी केला आहे. यामध्ये सौरभ पांढरे, तृप्ती जाधव, अथर्व खुसपे यांनी अभिनय साकारला. प्रकाशयोजना अभिषेक बडे यांची होती, तर श्रावणी बाचल यांनी संगीत दिले. भीमराव तोरणे, राजेंद्र कंडरे यांनी मार्गदर्शन केले. या यशाबद्दल अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष जवाहर वाघोलीकर, सचिव मिलिंद वाघोलीकर, प्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# प्रणव पोमणेची कॉर्फबॉल स्पर्धेसाठी भारतीय संघात निवड



**बारामती : प्रणव पोमणे यास धनादेश देताना विकास शहा (लेंगरेकर), प्रा. डॉ. अविनाश जगताप व इतर मान्यवर.**

**बारामती, ता. ५ :** पार्श्वभूमी अगदी ग्रामीण असली तरी अंगात परिश्रम करण्याची जिद्द असेल तर ग्रामीण युवकही आंतरराष्ट्रीय स्तरापर्यंत झेप घेऊ शकतात, ही बाब बारामतीच्या तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाचा प्रणव पोमणे याने सिद्ध केली आहे.

फलटण तालुक्यातील गोखळीनजिक खटकेवस्ती हे प्रणवचे मूळ गाव. बारामतीच्या टीसी महाविद्यालयात अकरावीपासूनच तो शिक्षण घेत आहे. सध्या तो एम. कॉम चे शिक्षण घेत आहे. त्याला कॉर्फबॉलमध्ये आवड होती. या खेळात त्याने कौशल्य सिद्ध केले होते. त्याच्या खेळातील या कौशल्यामुळे त्याची जागतिक कॉर्फबॉल स्पर्धेसाठी भारतीय संघात नुकतीच निवड झाली. २० ते २९ ऑक्टोबर २०२३ दरम्यान तैवानमधील तैपेई येथे ही स्पर्धा होणार आहे.

या स्पर्धेसाठी भारतीय संघाचे स्पर्धा पूर्व प्रशिक्षण शिबिर लव्हली प्रोफेशनल युनिव्हर्सिटी फगवार येथे १३ ते २४ सप्टेंबर दरम्यान होत असून प्रणव या शिबिरास उपस्थित राहणार आहे. प्रणव याने आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सलग दुसऱ्यांदा स्थान प्राप्त केले आहे.

या स्पर्धेसाठी तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाने प्रणव यास ५० हजार रुपयांचे आर्थिक साहाय्य देऊ केले आहे. संस्थेचे सदस्य विकास शहा (लेंगरेकर) यांच्या हस्ते हा धनादेश देण्यात आला.

प्रणव यास जिमखाना विभागाचे प्रमुख व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. गौतम जाधव व अशोक देवकर यांचे मार्गदर्शन लाभले आहे. प्रणव याच्या निवडीबद्दल संस्थेचे अध्यक्ष जवाहर शाह (वाघोलीकर) व सचिव मिलिंद शाह (वाघोलीकर), प्रा. डॉ. अविनाश जगताप आदींनी त्याचे अभिनंदन केले.

सकाळ ६/१०/२३ पान ४

सामना २५/७/२३ पान ५



बारामती : टीसी महाविद्यालयातील सीडबॉल कार्यशाळेत बोलताना प्राचार्य डॉ. अविनाश जगताप.

## तुळजाराम महाविद्यालयात सीडबॉल कार्यशाळा

**बारामती :** येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात पर्यावरण संवर्धन समितीच्या वतीने सीडबॉल तयार करण्यासाठी कार्यशाळेचे आयोजन केले गेले. ही कार्यशाळा महाविद्यालयाच्या कविवर्य मोरोपंत उद्यानामध्ये घेण्यात आली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांनी कार्यशाळेचे उद्घाटन केले. उपप्राचार्य डॉ. अशोक काळंगे, रजिस्ट्रार अभिनंदन शहा, उपप्राचार्य वैशाली माळी, समन्वयक संजय शेंडे व गोरखनाथ मोरे उपस्थित होते. या कार्यशाळेत महाविद्यालयाच्या वनस्पतिशास्त्र विभागातील डॉ. माधुरी पाटील यांनी विद्यार्थ्यांना सीडबॉल बनविण्याचे प्रशिक्षण देत मार्गदर्शन केले. महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेत ५०० सीडबॉल तयार केले. अनिता पवार यांनी सूत्रसंचालन केले. उदय कळंत्रे यांनी स्वागत केले. मुग्धा टांकसाळे यांनी आभार मानले. संस्थेचे अध्यक्ष जवाहर वाघोलीकर, सचिव मिलिंद वाघोलीकर यांनी मार्गदर्शन केले. सामना २५/५ ५.

Write note on the follo
. Construction and work
. Physical and chemical
. Classification of chem
. Plant Nutrients .

[12]

Attempt any ONE of

Write down industria ... chart, briefly

plain the uses of suga

Describe manufactur ... ea.

[12]

पुढारी २५/७/२३ पान ५

# महिलांनी अर्थसाक्षर होणे आवश्यक

**बारामती : पुढारी वृत्तसेवा**

सध्याच्या युगात महिलांनी अर्थसाक्षर होऊन योग्य ठिकाणी आर्थिक गुंतवणूक करणे महत्त्वाचे असल्याचे मत कर सल्लागार प्राची मंत्री यांनी व्यक्त केले.

तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या वतीने आयोजित केलेल्या महिला सबलीकरणाच्या कार्यक्रमात त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी मराठी विभागप्रमुख डॉ. सीमा नाईक - गोसावी होत्या. मंत्री म्हणाल्या, महिला अनेक क्षेत्रांत कार्यरत असल्या, तरी आर्थिक नियोजनाच्या संदर्भात त्या फारशा जागरूक नाहीत. महिला गुंतवणुकीकडे दुर्लक्ष करतात. त्यामुळे अशा कार्यक्रमांच्या माध्यमातून



टी. सी. महाविद्यालयात कर सल्लागार प्राची मंत्री यांचा सत्कार करण्यात आला.

महिलांना आर्थिकदृष्ट्या जागृत करणे गरजेचे आहे. या वेळी त्यांनी गुंतवणुकीच्या वेगवेगळ्या पर्यायांची माहिती दिली तसेच कोणत्या ठिकाणी गुंतवणूक केल्यानंतर भविष्यात त्याचा चांगला आर्थिक फायदा होऊ शकतो हेही सांगितले. डॉ. नाईक-गोसावी यांनी आर्थिक गुंतवणूक केल्यानंतरच

प्राची मंत्री यांचे प्रतिपादन, टी. सी. महाविद्यालयात मार्गदर्शन

स्त्री सक्षम होते, असे सांगितले. प्रास्ताविक डॉ. प्रतिभा जावळे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. कल्याणी लोंढे यांनी केले. सुषमा संगई यांनी आभार मानले. या कार्यक्रमाच्या आयोजनामध्ये संस्थेचे अध्यक्ष जवाहर शाह वाघोलीकर, सचिव मिलिंद शाह वाघोलीकर यांचे मार्गदर्शन लाभले.

पुढारी २५/७/२३ पान ५

# बारामतीच्या टीसी महाविद्यालयात स्पर्धेचे आयोजन

**बारामती :** तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील मीडिया अँड कम्युनिकेशन स्टडीज विभाग आणि बारामती नगरपालिका यांच्या वतीने शनिवार (ता. १९) ते सोमवार (ता. २१) दरम्यान 'थ्रू द लेन्स' या छायाचित्र स्पर्धेचे आयोजन केले आहे. विविध विषयांवर आधारित या स्पर्धेला छायाचित्रकारांकडून फोटो पाठवले जातात. या छायाचित्रांचे प्रदर्शन महाविद्यालयात आयोजित केले आहे. स्पर्धेसाठी पीपल्स, प्लेस, नेचर आणि स्वच्छ, सुंदर बारामती हे विषय दिले आहेत. विद्यार्थी, हौशी फोटोग्राफर आणि व्यावसायिक फोटोग्राफर्स हे दिलेल्या विषयांच्या अंतर्गत फोटो पाठवून विनाशुल्क सहभागी होऊ शकतात. विजेत्यांना पारितोषिके तसेच सहभागी छायाचित्रकारांना ई – सर्टिफिकेट देण्यात येणार आहे. इच्छुक स्पर्धकांनी स्वतः टिपलेला ८ बाय १२ साईजचे छायाचित्र महाविद्यालयातील मीडिया अँड कम्युनिकेशन स्टडीज विभागामध्ये बुधवार (ता. १६)पर्यंत जमा करावा. अधिक माहितीसाठी ९८८१३६१७५८ किंवा ८८६२०७४१७० या क्रमांकावर संपर्क साधावा.

दै. सकाळ पानं ०५



# बारामतीत येत्या ५, ६ ऑक्टोबरला मोरोपंत वादविवाद, वक्तृत्व स्पर्धा

बारामती, ता. १५ : येथील बारामती नगरपालिका व तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या वतीने आयोजित कविवर्य मोरोपंत वादविवाद व वक्तृत्व स्पर्धा यंदा ५ व ६ ऑक्टोबरला होणार आहे. स्पर्धेचे हे सुवर्णमहोत्सवी वर्ष आहे.

या स्पर्धेसाठी सद्यकालीन राजकीय परिस्थिती लोकशाहीस मारक आहे हा प्रस्ताव ठेवण्यात आला आहे. कनिष्ठ महाविद्यालयासाठी डिजिटल युगातील हरवलेले बालपण, प्रेम, नकार आणि हिंसा, आर्या मयूरपंतांची, माझ्या कल्पनेतील समृद्ध महाराष्ट्र, महाविद्यालय-संस्कार केंद्र की परिक्षा केंद्र, जैन आहार, विहार आणि आजचे डाएट असे विषय असून वरिष्ठ महाविद्यालयासाठी रानकवी ना. धों. महानोर, कृत्रिम बुद्धिमत्ता एक आव्हान, अस्वस्थ भारत: लोकशाही मूल्यांचा ऱ्हास, मोरोपंतांच्या काव्यातील रचना सौंदर्य, भारत एक उदयोन्मुख महासत्ता,

समाज माध्यमे व विचार स्वातंत्र्य, अनेकान्तवाद सद्यकालीन उपयुक्तता हे विषय देण्यात आले आहेत.

स्पर्धेत भाग घेण्यासाठी www.tccollege.org/moropant या वेबसाइटला भेट द्यावी, किंवा 8788933638 या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन प्राचार्य डॉ. अविनाश जगताप व कार्याध्यक्ष कृष्णा कुलकर्णी यांनी केले आहे.

Tuljaram Chaturchand College * Baramati * Library

दै. पुढारी



# विद्यार्थ्यांनी वाचनसंस्कृती जोपासावी : प्रा. कोकरे

बारामती : पुढारी वृत्तसेवा

विद्यार्थ्यांनी वाचनसंस्कृती जोपासली पाहिजे, असे मत ग्रामीण कथाकार व प्रबोधनकार प्रा. रवींद्र कोकरे यांनी व्यक्त केले.

तुळजाराम चतुरचंद कनिष्ठ महाविद्यालयातील वाङ्मय मंडळाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. डॉ. सीमा नाईक-गोसावी अध्यक्षस्थानी होत्या.

प्रा. कोकरे म्हणाले की, विद्यार्थ्यांनी



वाङ्मय मंडळाचे उद्घाटन प्रा. रवींद्र कोकरे यांच्या उपस्थितीत केले.

वाङ्मय मंडळाच्या माध्यमातून लिहिते व्हावे आणि स्वतःला सिद्ध करावे. आई-वडिलांची सेवा करावी तसेच गोरगरिबांना दान करावे. त्यांनी कथाकथनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे मनोरंजन व प्रबोधन केले.

डॉ. गोसावी यांनी या वेळी शब्दांसोबत मैत्री करून मराठी भाषेची अस्मिता जपण्याचे आवाहन केले. प्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांचे मार्गदर्शन लाभले. उपप्राचार्य डॉ. सचिन गाडेकर, कनिष्ठ उपप्राचार्या वैशाली माळी, समन्वयक प्रा. गोरखनाथ मोरे यांच्यासह सर्व शिक्षकवृंद आणि विद्यार्थी उपस्थित होते. प्रास्ताविक वाङ्मय मंडळ प्रमुख प्रा. संजय शेंडे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. स्नेहल कदम यांनी केले. प्रा. रमेश मोरे यांनी आभार मानले.

दैनिक पुढारी दि. 03/10/23 पान 2

## शंकर मोरे



शिवनगर : मेडद (ता. बारामती) येथील शंकर ऊर्फ बापू तुळशीराम मोरे (वय ५६) यांचे सोमवारी (दि. २) निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, एक मुलगा, एक मुलगी असा परिवार आहे. मोरे हे बारामती येथील टी. सी. कॉलेजमध्ये कार्यरत होते. सामाजिक कार्यात सक्रिय असणारे अशी त्यांची ओळख होती.

पुढारी 3/10/23, 2



बारामती : कर्मवीरांच्या जयंतीनिमित्त मार्गदर्शन करताना विजय चोरमारे.

## कर्मवीरांच्या विचारांचे अनुकरण करा : डॉ. चोरमारे

बारामती : कर्मवीर भाऊराव पाटील यांनी अस्पृश्यता नष्ट करत बहुजन समाजातील मुलांना शिक्षणाची दालने खुली करून दिली. त्या काळात कमवा व शिकाच्या माध्यमातून स्वावलंबनाचे तत्त्व विद्यार्थ्यांना शिकविले. कर्मवीरांमधील त्याग व निष्ठा हे गुण आणि कर्मवीरांचे विचार विद्यार्थ्यांनी आत्मसात करावेत, असे मत ज्येष्ठ पत्रकार विजय चोरमारे यांनी व्यक्त केले.

रयतचे संस्थापक पद्मभूषण डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या १३६ व्या जयंतीनिमित्त शहर व तालुक्यातील सर्व विद्यालये व महाविद्यालये यांच्यावतीने आयोजित संयुक्त कर्मवीर जयंती उत्सवानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

संयुक्त कर्मवीर जयंती समितीचे अध्यक्ष प्राचार्य अविनाश जगताप व समन्वय समितीचे सदस्य सातव यांच्या हस्ते दीप प्रज्वलन केले. प्राचार्य अविनाश जगताप यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी स्थानिक स्कूल समितीचे सदस्य संभाजी होळकर, सूरज सातव, अमर धुमाळ, आनंदा गांगुर्डे, राजेंद्र अगवणे, संजय शेंडे आदी उपस्थित होते. वक्तृत्व स्पर्धेतील विजेत्यांनी याप्रसंगी पारितोषिक प्रदान केले. प्राचार्य पोपट मोरे यांनी प्रास्ताविक केले; विकास जाधव व मनीषा रूपनवर यांनी सूत्रसंचालन केले व श्री छत्रपती शाहू हायस्कूलचे प्राचार्य गणपत तावरे यांनी आभार मानले.

## बारामतीच्या सुषमा जाधव यांना पीएच. डी.



सुषमा जाधव

बारामती : तुळजाराम चतुरचंद कनिष्ठ महाविद्यालयातील मराठी विभागाच्या सुषमा जाधव यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वतीने कलाशाखा अंतर्गत मराठी विषयाची पीएच. डी. पदवी प्रदान केली आहे. त्यांच्या पीएच. डी. संशोधन प्रबंधाचा विषय 'आनंदीबाई शिर्के यांच्या समग्र साहित्याचा अभ्यास' हा होता. या शोध कार्यासाठी त्यांना भिगवणच्या कला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव वाळुंज यांनी मार्गदर्शन केले. आनंदीबाई शिर्के यांनी केलेले लेखन शंभर वर्षांपूर्वीचे होते. या संशोधन प्रबंधाच्या माध्यमातून दुर्लक्षित लेखिकेला प्रकाशात आणले. या शैक्षणिक कार्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष जवाहर शाह (वाघोलीकर), सचिव, मिलिंद शाह (वाघोलीकर) महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांनी त्यांचे अभिनंदन केले.

## प्रा. सुषमा जाधव यांना पीएच.डी.

लोकमत न्यूज नेटवर्क



बारामती : तुळजाराम चतुरचंद कनिष्ठ महाविद्यालयातील मराठी विभागाच्या प्रा. सुषमा जाधव यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे यांनी नुकतीच कला शाखाअंतर्गत मराठी विषयाची पीएच. डी. पदवी प्रदान केली. त्यांच्या पीएच.डी. संशोधन प्रबंधाचा विषय 'आनंदीबाई शिर्के यांच्या समग्र साहित्याचा अभ्यास' हा होता.

शोधकार्यासाठी त्यांना कला महाविद्यालय भिगवण, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव वाळुंज यांनी मार्गदर्शन केले. आनंदीबाई शिर्के यांनी केलेले लेखन शंभर वर्षांपूर्वीचे होते, या संशोधन प्रबंधाच्या माध्यमातून दुर्लक्षित लेखिकेला प्रकाशात आणले. या शैक्षणिक कार्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष जवाहर शाह, सचिव मिलिंद शाह, प्राचार्य डॉ. अविनाश जगताप, उपप्राचार्य डॉ. सचिन गाडेकर, उपप्राचार्य डॉ. अशोक काळंगे, रजिस्ट्रार अभिनंदन शहा, वैशाली माळी, प्रा. गोरखनाथ मोरे, प्रा. संजय शेंडे आदींनी त्यांचे अभिनंदन केले.

following (any Two):

Effect of Conflict?

of Decision.

vation? Explain Herzberg's two factor theory of Motivation.

following (any Two):

of Managers Skills.

ss of Conflict.

note on Functions of Leader.

following (any One):

p? Explain its types.

Management? Explain strategies of Time Management.

पुढारी



स्वररंग युवा महोत्सवात प्राचार्य डॉ. देविदास वायदंडे यांचा सत्कार करताना चंद्रगुप्त शाह वाघोलीकर.

# टी. सी. महाविद्यालयात 'स्वररंग' युवा महोत्सवाचे उद्‌घाटन

**बारामती : पुढारी वृत्तसेवा**

तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती येथे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठांतर्गत 'स्वररंग' या आंतरमहाविद्यालयीन युवक महोत्सव २०२३ चे उद्‌घाटन शुक्रवारी (दि. २९) पार पडले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषदेचे सदस्य व सोमेश्वरनगरच्या मु. सा. काकडे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. देविदास वायदंडे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. अध्यक्षस्थानी अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे सदस्य चंद्रगुप्त शाह-वाघोलीकर हे होते. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. अभिजित कुलकर्णी हे सन्माननीय अतिथी म्हणून उपस्थित होते.

या कार्यक्रमात बोलताना डॉ. वायदंडे म्हणाले, 'ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये अंगभूत कौशल्ये असूनही त्यांना व्यासपीठ मिळत नाही. 'स्वररंग'च्या माध्यमातून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ लोकाभिमुख कार्यक्रम सातत्याने आयोजित करीत असते. लोककला हे सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन आहे. सर्वसामान्यांना लोककलांच्या माध्यमातून व्यक्त होण्याची संधी या कलाप्रकारांनी दिली आणि ही लोकचळवळ बनली. यातून सृजनशील व मोठे कलावंत घडतात. टी. सी. कॉलेज सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने सोपवलेल्या अनेक उपक्रमांचे नेहमीच उत्तम संयोजन करीत असते. सुसज्ज व अद्ययावत सोई-सुविधांनी युक्त असे टी. सी. महाविद्यालय आहे. भविष्यात हे कॉलेज विद्यापीठ होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या कार्यक्रमात एकूण २९ कलाप्रकारांमध्ये स्पर्धा होणार असून बारामती, कर्जत, दौंड, जामखेड आदी तालुक्यांतील २२ महाविद्यालयांतील एकूण ७०० विद्यार्थी सहभागी झाले आहेत.

प्रास्ताविक प्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांनी केले. महाविद्यालयास ३७ वर्षांनंतर या युवक महोत्सवाची संधी विद्यापीठाने दिली, याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला. या कार्यक्रमाच्या आयोजनामध्ये संस्थेचे अध्यक्ष जवाहर शाह वाघोलीकर, सचिव मिलिंद शाह वाघोलीकर यांचे मार्गदर्शन लाभले. सूत्रसंचालन डॉ. सुशील देशमुख, डॉ. विवेक बळे यांनी केले. डॉ. भगवान माळी यांनी आभार मानले.



**बारामती : प्राची मंत्री यांचे स्वागत करताना डॉ. सीमा नाईक-गोसावी.**

# महिलांनी अर्थसाक्षर व्हावे : मंत्री

**बारामती, ता. २८ :** 'महिलांनी अर्थसाक्षर होणे गरजेचे आहे. योग्य ठिकाणी आर्थिक गुंतवणूक करणे महत्त्वाचे आहे.' असे प्रतिपादन सोमाणी ग्रुपच्या संचालक प्राची मंत्री यांनी केले.

तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या वतीने आयोजित केलेल्या महिला सबलीकरणाच्या कार्यक्रमात त्या बोलत होत्या. डॉ. सीमा नाईक-गोसावी अध्यक्षस्थानी होत्या.

प्राची मंत्री म्हणाल्या, 'महिला अनेक क्षेत्रात कार्यरत असल्या तरी आर्थिक नियोजनाच्या संदर्भात त्या फारशा जागरूक नाहीत. महिला गुंतवणुकीकडे दुर्लक्ष करतात. त्यामुळे अशा कार्यक्रमांच्या माध्यमातून महिलांना आर्थिक दृष्ट्या जागृत करणे गरजेचे आहे.' डॉ. सीमा नाईक-गोसावी यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. प्रतिभा जावळे यांनी प्रास्ताविक केले. कल्याणी लोंढे यांनी सूत्रसंचालन केले; तर सुषमा संगई यांनी आभार मानले.

सकाळ २९।८।२३ ५

दै. पुढारी

गुरुवार, १० ऑगस्ट २०२३ ५

# विद्यापीठाकडून टी. सी. महाविद्यालयाला दहा पुरस्कार

10/08/23

बारामती : पुढारी वृत्तसेवा

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाला उत्कृष्ट महाविद्यालय, उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी, उत्कृष्ट संघनायक, उत्कृष्ट स्वयंसेवक, तसेच उत्कृष्ट शिबिर सहभाग असे एकूण १० पुरस्कार देण्यात आले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात नुकत्याच पार पडलेल्या कार्यक्रमात हे पुरस्कार प्रदान करण्यात आले. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, व्यवस्थापन परिषद सदस्या बागेश्री मंथाळकर, प्राचार्य डॉ. नितीन घोरपडे, शिंगणापूरकर, प्राचार्य डॉ. देवीदास वायदंडे, प्रसन्नजीत फडणवीस, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. सदानंद भोसले, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. अभिजित कुलकणी, रासेयोचे माजी संचालक डॉ. प्रभाकर देसाई यांच्या हस्ते सन्मानपूर्वक हे पुरस्कार प्रदान करण्यात आले.



विद्यापीठाकडून टी. सी. महाविद्यालयाला विविध पुरस्कार प्राप्त झाले.

**प्राध्यापक, विद्यार्थ्यांचा पारितोषिक देऊन गौरव**

महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. अविनाश जगताप यांना उत्कृष्ट महाविद्यालयाचा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. डॉ. विलास कर्डिले यांना उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी विद्यापीठस्तरीय वर्ष २०१८-१९ आणि उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी राज्यस्तरीय वर्ष २०२०-२१ असे दोन पुरस्कार, उत्कृष्ट जिल्हा समन्वयक वर्ष २०१९-२०, तसेच उत्कृष्ट संघनायक, राज्यस्तरीय साहसी क्रीडा शिबिर चिखलदरा, पुणे ते पंढरपूर राज्यस्तरीय पायी वारी असे दोन पुरस्कार अशा एकूण पाच पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. डॉ. भगवान माळी यांना कोल्हापूर पूर आपत्ती निवारण शिबिरामध्ये वर्ष २०१९ मध्ये सहभाग घेतल्याबद्दल सन्मानित करण्यात आले. महाविद्यालयातील विद्यार्थी गणेश दडस उत्कृष्ट स्वयंसेवक आणि विद्यार्थिनी गंधाली भट उत्कर्ष शिबिर सहभाग या विद्यार्थ्यांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष जवाहर शाह वाघोलीकर, सचिव मिलिंद शाह वाघोलीकर, संस्थेचे सर्व सदस्य तसेच महाविद्यालयाचे रजिस्ट्रार आणि प्राध्यापक यांनी पुरस्कार मिळाल्याबद्दल सर्वांचे विशेष अभिनंदन केले.

# टीसी महाविद्यालयातील छायाचित्र प्रदर्शनाला प्रतिसाद

**बारामती : पुढारी वृत्तसेवा**

बारामती येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील मीडिया अँड कम्युनिकेशन स्टडीज विभाग आणि बारामती नगरपरिषद बारामती यांच्या संयुक्त विद्यमाने 'यू द प्रेम्स' छायाचित्र स्पर्धा आणि प्रदर्शन भरविण्यात आले होते. जागतिक छायाचित्र दिनाचे औचित्य साधून घेण्यात आलेल्या या प्रदर्शनाला भारतभरातून मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला.

दरवर्षी १९ ते २२ ऑगस्टदरम्यान मीडिया अँड कम्युनिकेशन स्टडीज विभागाकडून ही स्पर्धा व प्रदर्शन भरवले जाते. पीपल, प्लेस, नेचर आणि स्वच्छ, सुंदर बारामती या विषयावर आधारित ३०० हून अधिक छायाचित्रांचा यामध्ये समावेश होता. ग्रामीण व शहरी भागातील जनजीवन, विकास, ऐतिहासिक ठिकाणे, नैसर्गिक विविधता, पशुपक्षी आणि प्राणी इत्यादी विषयांवरीलदेखील बोलकी छायाचित्रे पाहायला मिळाली.



टी. सी. महाविद्यालयात छायाचित्र प्रदर्शनाचे उद्घाटन करताना मान्यवर.

या स्पर्धेचे परीक्षण वाइल्ड लाइफ फोटोग्राफर संदीप तावरे यांनी केले. उद्घाटन मुख्याधिकारी महेश रोकडे आणि प्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांनी केले. आरोग्य निरीक्षक राजेंद्र सोनावणे, अक्षय नाईक, उपप्राचार्य डॉ. अशोक काळंगे, डॉ. सचिन गाडेकर, डॉ. योगिनी मुळे, निबंधक अभिनंदन शहा, मीडिया विभागाचे प्रमुख प्रा. राहुल चौधरी, प्रा. रणजित पंडित, प्रा. गायत्री नंदकुमार, प्रा. ऋतुजा आगम या वेळी उपस्थित होते. अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष जवाहर शाह वाघोलीकर, सचिव मिलिंद शाह वाघोलीकर यांनी या कार्यक्रमास शुभेच्छा दिल्या.

स्पर्धेमध्ये स्वच्छ बारामती, सुंदर बारामती या विषयात स्वराज कांबळे यांनी प्रथम, केदार किर्वे यांनी द्वितीय, तर वैभव गायकवाड यांनी तृतीय क्रमांक मिळविला. प्लेस या विषयात साक्षी जाधव यांनी प्रथम, तर ऋषिकेश वाघमारे यांनी द्वितीय क्रमांक मिळविला. 'पिपल' या विषयात प्रथमेश मगदूम यांनी प्रथम, आशय चिट्टे यांनी द्वितीय, तर अक्षय सोनावणे यांनी तृतीय क्रमांक मिळविला. नेचर या विषयात आर्या टिळेकर यांनी प्रथम, भूषण भोये यांनी द्वितीय, तर सौरभ घाडगे यांनी तृतीय क्रमांक मिळविला.

---



## संक्षिप्त



टी. सी. महाविद्यालयात सीडबॉल कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी बोलताना प्राचार्य डॉ. अविनाश जगताप.

### टी. सी. महाविद्यालयात सीडबॉल कार्यशाळा

**बारामती :** येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या कनिष्ठ विभागाच्या वतीने सीडबॉल कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. ही कार्यशाळा महाविद्यालयाच्या कविवर्य मोरोपंत उद्यानामध्ये घेण्यात आली. या कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश जगताप, उपप्राचार्य डॉ. अशोक काळंगे आणि रजिस्ट्रार अभिनंदन शहा, उपप्राचार्या प्रा. वैशाली माळी, समन्वयक प्रा. संजय शेंडे, समन्वयक प्रा. गोरखनाथ मोरे आदी उपस्थित होते. या कार्यशाळेत महाविद्यालयाच्या वनस्पतिशास्त्र विभागातील डॉ. माधुरी पाटील यांनी विद्यार्थ्यांना सीडबॉल बनविण्याचे प्रशिक्षण देत मार्गदर्शन केले. महाविद्यालयाच्या कला शाखेतील एकूण ६० विद्यार्थी-विद्यार्थिनींनी या कार्यशाळेत सहभाग घेऊन एकूण ५०० सीडबॉल तयार केले. उपस्थितांचे स्वागत पर्यावरण संवर्धन समितीचे प्रमुख प्रा. उदय कळंत्रे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. अनिता पवार यांनी केले. प्रा. मुग्धा टाकसाळे यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या आयोजनामध्ये संस्थेचे अध्यक्ष जवाहर शाह वाघोलीकर, सचिव मिलिंद शाह वाघोलीकर यांचे मार्गदर्शन लाभले.

# वक्तृत्व व वादविवाद स्पर्धेचे यंदा सुवर्णमहोत्सवी वर्ष

**| बारामती :** कविवर्य मोरोपंतांची बारामतीनगरी असा या नगरीचा नावलौकिक आहे. कविवर्य मोरोपंत हे बुद्धिमत्ता लाभलेले कवी होते. त्या काळात ७५ हजारांहून अधिक आर्यांची निर्मिती केली होती. त्यांच्या नावाने दर वर्षी भरणाऱ्या कविवर्य मोरोपंत आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व व वादविवाद स्पर्धेचे यंदा सुवर्णमहोत्सवी वर्ष आहे. विजेते स्पर्धक ५० हजारांपेक्षा जास्त रकमेची बक्षिसे जिंकतात. संपूर्ण महाराष्ट्रातील महाविद्यालयीन स्तरावर मोरोपंत स्पर्धेचा नावलौकिक आहे. बारामती नगर परिषद व तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय यांच्या संयुक्त सहकार्याने कविवर्य मोरोपंत स्पर्धेचे दर वर्षी सप्टेंबर महिन्यात आयोजन केले जाते. यंदा या स्पर्धा दि. ५ व ६ ऑक्टोबर रोजी आयोजित केल्या आहेत. कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांसाठी या स्पर्धा घेतल्या जातात.

पुण्यनगरी १९।९।२३

दैनिक सकाळ दि. ०७/१०/२३ पान ५

# बारामतीत कविवर्य मोरोपंत वक्तृत्व स्पर्धा उत्साहात

**बारामती, ता. ६ :** येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय व बारामती नगरपरिषद यांच्या वतीने आयोजित कविवर्य मोरोपंत आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व व वादविवाद स्पर्धेचे उद्घाटन गुरुवारी (ता. ५) अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष जवाहर शाह (वाघोलीकर) यांच्या अध्यक्षतेखाली झाले. या वेळी नगर परिषदेचे मुख्याधिकारी महेश रोकडे, संस्थेच्या नियामक मंडळाचे सदस्य चंद्रगुप्त शाह (वाघोलीकर) उपस्थित होते.

नगरपरिषदेच्या पुढाकाराने १९७२ मध्ये ही स्पर्धा सुरू केली होती. यंदा स्पर्धेचे सुवर्णमहोत्सवी वर्ष आहे. या प्रसंगी मुख्याधिकारी रोकडे यांनी वाचन संस्कृती लोप पावत चाललेल्या डिजिटल युगामध्ये वक्तृत्वाचा ठेवा अखंडितपणे ५० वर्षे जपल्याबद्दल संस्थेच्या पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले.



**बारामती : मुख्याधिकारी महेश रोकडे यांचा सत्कार करताना अनेकांतचे अध्यक्ष जवाहर वाघोलीकर.**

तसेच, जवाहर शाह यांनी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाण व नेतृत्वगुण विकसित होण्यासाठी वक्तृत्व व वादविवाद स्पर्धा अत्यंत मोलाची असल्याचे नमूद केले.

महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून अनेक विद्यार्थी या स्पर्धेकरिता सहभागी झाले असून, स्पर्धेच्या पहिल्या दिवशी कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालय गटामध्ये वक्तृत्व स्पर्धा होणार आहेत. तर, दुसऱ्या दिवशी वादविवाद स्पर्धा व उत्स्फूर्त स्पर्धा होत आहे.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांनी स्वागत केले. स्पर्धेचे कार्याध्यक्ष कृष्णा कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केले. उपप्राचार्य डॉ. सचिन गाडेकर यांनी आभार मानले, प्रणीत वाबळे व स्नेहल कदम यांनी सूत्रसंचालन केले.

दैनिक सकाळ ०७/१०/२३ पान ५

लोकमत दि. २०/१०/२३ पान २

# मोरोपंत वक्तृत्व स्पर्धेत पंकज पाडुळे विजेता

लोकमत न्यूज नेटवर्क

**बारामती :** बारामती नगरपरिषद आणि तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित वक्तृत्व व वादविवाद स्पर्धा पार पडली. सुवर्णमहोत्सवी वर्षात यशस्वी आयोजन करण्यात आले.

वक्तृत्व स्पर्धेचे विजेतेपद पंकज पंढरीनाथ बी.के. पाडुळे (बिर्ला महाविद्यालय, मुंबई) याने पटकावले, तर याच महाविद्यालयाचा संघ वादविवाद स्पर्धेचा प्रथम मानकरी ठरला. स्पर्धेचे विजेतेपद यश रवींद्र पाटील याने पटकावले, तर कनिष्ठ महाविद्यालय विभागामध्ये श्रद्धा सुरेश अहिनवेने प्रथम क्रमांक मिळविला.

मुंबई विद्यापीठातील लोककला अकादमीचे, विभागप्रमुख डॉ.गणेश चंदनशिवे यांच्या हस्ते विजेत्यांना पारितोषिक प्रदान करण्यात आले. वक्तृत्वामधील मोरोपंत विषयामध्ये तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या जयराम प्रकाश पिंगळे याने वरिष्ठ विभागामध्ये, तर समृद्धी धनंजय निळ हिने कनिष्ठ महाविद्यालयात प्रथम क्रमांक मिळविला.

या स्पर्धेचे हे ५०वे वर्ष आहे. राज्यातील ८७ स्पर्धक स्पर्धेत सहभागी झाले होते. स्पर्धेचे परीक्षण डॉ.विलास बुवा, प्रा.मानाजी गावडे, विवेक पांडकर, प्रा.राजकुमार कदम, प्रा.गोरखनाथ लडकत, प्रा.जया कदम यांनी केले. जीवराज सभागृहात पारितोषिक वितरण समारंभ संपन्न झाला. यावेळी डॉ.गणेश चंदनशिवे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा.स्न्हेल कदम आणि प्रा. ऋतुजा आगम यांनी केले, तर प्रा. डॉ. सीमा नाईक गोसावी यांनी आभार मानले. केले.



## स्पर्धेचा सविस्तर निकाल पुढीलप्रमाणे

**कनिष्ठ महाविद्यालय वक्तृत्व स्पर्धा :**

- प्रथम - श्रद्धा अहिनवे (शारदाबाई पवार महाविद्यालय, बारामती),
- मोरोपंत विषयात प्रथम - समृद्धी निळ (तुळजाराम चतुरचंद कनिष्ठ महाविद्यालय, बारामती)
- द्वितीय - गायत्री अंभुरे (फर्ग्युसन कनिष्ठ महाविद्यालय, पुणे)
- वरिष्ठ महाविद्यालय वक्तृत्व स्पर्धा
- प्रथम - पंकजपांडुळे (बी.के. बिर्ला महाविद्यालय, मुंबई)
- मोरोपंत या विषयात प्रथम - जयराम पिंगळे (तुळजाराम चतुरचंद महाविदयालय, बारामती)
- द्वितीय - महेश उशीर (न्यू आर्ट्स कॉमर्स अँन्ड सायन्स कॉलेज अहमदनगर)
- विशेष प्रावीण्य - गौरी पवार (शिवनगर विद्या प्रसारक मंडळ अभियांत्रिकी महाविद्यालय, माळेगाव)
- उत्तेजनार्थ - केतन गुप्ता (शेठ जे. एन. पालीवाला कॉलेज, पाली, रायगड)
- उत्तेजनार्थ - यश पाटील (बी.के. बिर्ला महाविद्यालय, मुंबई)
- वाद - विवाद स्पर्धा
- प्रथम - संघ - बी.के. बिर्ला महाविद्यालय, मुंबई
- (स्पर्धक - पंकज पांडुळे आणि यश पाटील)
- द्वितीय - संघ - न्यू आर्ट्स, कॉमर्स, सायन्स महाविद्यालय अहमदनगर
- (स्पर्धक - महेश उशीर आणि आकाश मोहिते)
- प्रथम - यश पाटील (बी.के. बिर्ला महाविद्यालय, मुंबई) द्वितीय - मुग्धा थोरात (फर्ग्युसन महाविद्यालय, पुणे)

दैनिक पुढारी

दिल्ली शुक्रवार, १५ सप्टेंबर २०२३ ५ दल्या.

# बारामतीत कविवर्य मोरोपंत वक्तृत्व, वादविवाद स्पर्धा

**बारामती : पुढारी वृत्तसेवा**

येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय व बारामती नगरपरिषद यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात दि. ५ व ६ ऑक्टोबर रोजी कविवर्य मोरोपंत राज्यस्तरीय वक्तृत्व व वादविवाद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालय अशा दोन गटांत ही स्पर्धा पार पडणार आहे. स्पर्धेत वादविवादासाठी 'सद्यकालीन राजकीय परिस्थिती लोकशाहीस मारक आहे, हा विषय देण्यात आला आहे. कनिष्ठ महाविद्यालयात वक्तृत्व स्पर्धेसाठी 'डिजिटल युगातील हरवलेले बालपण', 'प्रेम, नकार आणि हिंसा', 'आर्या मयूरपंतांची', 'माझ्या कल्पनेतील समृद्ध महाराष्ट्र', 'महाविद्यालय-संस्कार केंद्र की परीक्षा केंद्र?' आणि 'जैन आहार विहार आणि आजचे डाएट' हे सहा विषय देण्यात आले आहेत.

वरिष्ठ महाविद्यालय गटासाठी 'रानकवी ना. धों. महानोर', 'कृत्रिम बुद्धिमत्ता एक आव्हान', 'अस्वस्थ भारत : लोकशाही मूल्यांचा ऱ्हास', 'मोरोपंतांच्या काव्यातील रचना सौंदर्य', 'भारत एक उद्योन्मुख महासत्ता', 'समाजमाध्यमे आणि विचार स्वातंत्र्य' व 'अनेकान्तवाद सद्य:कालीन उपयुक्तता' हे सात विषय देण्यात आले आहेत.

विजेत्यांना चषकासह ५० हजार रुपयांहून अधिक रकमेची रोख बक्षिसे दिली जाणार आहेत. बारामतीमधील ही स्पर्धा राज्यातील नामांकित समजली जाते. या स्पर्धेने अनेक चांगले वक्ते, समाजसेवक, राजकारण, चित्रपट, शिक्षण, नाट्य, वकील, पत्रकार, विचारवंत दिले आहेत. आजवरच्या या स्पर्धेच्या विजेत्यांमध्ये अविनाश धर्माधिकारी, डॉ. अरुणा ढेरे, समीरन वाळवेकर, अभिराम भडकमकर, परेश मोकाशी, माधुरी दीक्षित, भक्ती हुबळीकर, प्रदीप टिल्लू या मान्यवरांचा सहभाग राहिला आहे.

या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी स्पर्धकांनी www.tccollege.org/moropant या संकेतस्थळाला भेट द्यावी, असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश जगताप, कार्याध्यक्ष प्रा. कृष्णा कुलकर्णी यांनी केले आहे.

दै. पुढारी दि. ३०/१०/२०२३ पान ४

# कविवर्य मोरोपंत वक्तृत्व स्पर्धेत पंकज पांडूळे विजेता

## वादविवादचे विजेतेपद मुंबईच्या बी. के. बिर्ला महाविद्यालयाकडे

३०/१०/२३ पान ४

**बारामती : पुढारी वृत्तसेवा**

बारामती नगरपरिषद व तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय कविवर्य मोरोपंत वक्तृत्व स्पर्धेचे विजेतेपद मुंबईच्या बी. के. बिर्ला महाविद्यालयाच्या पंकज पंढरीनाथ पांडूळे याने पटकावले. याच महाविद्यालयाचा संघ वादविवाद स्पर्धेचा प्रथम क्रमांकाचा मानकरी ठरला.

स्पर्धेचे यंदाचे ५० वे वर्ष होते. राज्यभरातून ८७ स्पर्धक सहभागी झाले होते. प्रसिद्ध लोककलावंत आणि मुंबई विद्यापीठातील लोककला अकादमीचे, विभागप्रमुख डॉ. गणेश चंदनशिवे यांच्या हस्ते विजेत्यांना पारितोषिक प्रदान करण्यात आले. अध्यक्षस्थानी संस्थेचे विकास शहा लेंगरेकर होते. वक्तृत्व स्पर्धेत मोरोपंत विषयामध्ये तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या जयराम प्रकाश पिंगळे याने वरिष्ठ विभागामध्ये, तर समृद्धी धनंजय निळ हिने कनिष्ठ महाविद्यालयामध्ये प्रथम क्रमांक मिळवला. विजेतेपद यश रवींद्र पाटील याने पटकावले. तर कनिष्ठ महाविद्यालय विभागामध्ये श्रध्दा सुरेश अहिनवे हिने प्रथम क्रमांक मिळवला.




राज्यस्तरीय कविवर्य मोरोपंत स्पर्धेत विजेतेपद मिळविणाऱ्या पंकज पांडूळे याला गौरविताना मान्यवर.

स्पर्धेचे परीक्षण डॉ. विलास बुवा, प्रा. मानाजी गावडे, विवेक पांडकर, प्रा. राजकुमार कदम, प्रा. गोरखनाथ लडकत, प्रा. जया कदम यांनी केले. लेंगरेकर यांनी विजेत्यांचे कौतुक केले. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांनी केले. स्वागत कार्याध्यक्ष प्रा. कृष्णा कुलकर्णी यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. स्नेहल कदम व प्रा. ऋतुजा आगम यांनी केले, तर प्रा. डॉ. सीमा नाईक-गोसावी यांनी आभार मानले.

स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे :

कनिष्ठ महाविद्यालय वक्तृत्व स्पर्धा - प्रथम क्रमांक : श्रध्दा सुरेश अहिनवे (शारदाबाई पवार महाविद्यालय, बारामती). मोरोपंत या विषयात प्रथम क्रमांक : समृद्धी धनंजय निळ (तुळजाराम चतुरचंद कनिष्ठ महाविद्यालय, बारामती), द्वितीय क्रमांक : गायत्री गणेश अंभुरे (फर्ग्युसन कनिष्ठ महाविद्यालय, पुणे). वरिष्ठ महाविद्यालय वक्तृत्व स्पर्धा - प्रथम क्रमांक : पंकज पंढरीनाथ पांडुळे (बी. के. बिर्ला महाविद्यालय, मुंबई). मोरोपंत या विषयात प्रथम क्रमांक : जयराम प्रकाश पिंगळे (तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती), द्वितीय क्रमांक : महेश जनार्दन उशीर (न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, अहमदनगर). विशेष प्रावीण्य : गौरी भारत पवार (शिवनगर विद्या प्रसारक मंडळ अभियांत्रिकी महाविद्यालय, माळेगाव). उत्तेजनार्थ : केतन दिनेश गुप्ता (शेठ. जे. एन. पालीवाला कॉलेज, पाली, रायगड). उत्तेजनार्थ : यश रवींद्र पाटील (बी. के. बिर्ला महाविद्यालय, मुंबई). वादविवाद स्पर्धा - प्रथम क्रमांक : संघ - बी. के. बिर्ला महाविद्यालय, मुंबई, द्वितीय क्रमांक : संघ - न्यू आर्ट्स, कॉमर्स, सायन्स महाविद्यालय, अहमदनगर (स्पर्धक - महेश जनार्दन उशीर आणि आकाश दत्तात्रय मोहिते). उत्स्फूर्त वक्तृत्व स्पर्धा - प्रथम क्रमांक : यश रवींद्र पाटील (बी. के. बिर्ला महाविद्यालय, मुंबई), द्वितीय क्रमांक : मुग्धा अमित थोरात (फर्ग्युसन महाविद्यालय, पुणे).



प्रा. अय्यर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करताना मान्यवर.

# इंग्रजी संवाद कौशल्य कार्यशाळा

**बारामती :** इंग्रजी विषयाचे ख्यातनाम प्रा.डॉ. के. एस. अय्यर यांच्या जयंतीनिमित्त विद्या प्रतिष्ठान संस्थेच्या कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाच्या इंग्रजी विभागाने इंग्रजी संवाद कौशल्य कार्यशाळेचे आयोजन केले होते. कार्यशाळेचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भरत शिंदे यांनी केले. या वेळी प्रा. डॉ. शशांक माने, प्रा. धनंजय भोसले, उपप्राचार्य डॉ. शामराव घाडगे, डॉ. श्रीराम गडकर उपस्थित होते. प्राचार्य डॉ. शिंदे यांनी प्रा. डॉ. अय्यर यांच्या कार्याचा आढावा घेतला. डॉ. माने यांनी प्रा. अय्यर यांच्या कार्याचा परिचय नव्या पिढीला करून दिला. त्याचबरोबर त्यांनी इंग्रजी संवाद कौशल्य कसे आत्मसात करावे, याबाबत माहिती दिली. प्रा. धनंजय भोसले यांनी या वेळी विचार व्यक्त केले. प्रास्ताविक प्रा. डॉ. संजय खिलारे यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्रा. नीलेश पांढरे यांनी करून दिला. सूत्रसंचालन डॉ. भाग्यश्री कुलकर्णी, प्रा. दादासाहेब मगर यांनी केले. प्रा. राजकुमार कदम यांनी आभार मानले. कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी उपप्राचार्य प्रा. डॉ. शामराव घाडगे आणि डॉ. लालासाहेब काशिद यांनी परिश्रम घेतले.

सकाळ पान ५

पुणे जिल्हा पुणे, शनिवार, ७ ऑक्टोबर २०२३

# बारामतीत कविवर्य मोरोपंत वक्तृत्व स्पर्धा उत्साहात

**बारामती, ता. ६ :** येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय व बारामती नगरपरिषद यांच्या वतीने आयोजित कविवर्य मोरोपंत आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व व वादविवाद स्पर्धेचे उद्घाटन गुरुवारी (ता. ५) अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष जवाहर शाह (वाघोलीकर) यांच्या अध्यक्षतेखाली झाले. या वेळी नगर परिषदेचे मुख्याधिकारी महेश रोकडे, संस्थेच्या नियामक मंडळाचे सदस्य चंद्रगुप्त शाह (वाघोलीकर) उपस्थित होते.

नगरपरिषदेच्या पुढाकाराने १९७२ मध्ये ही स्पर्धा सुरू केली होती. यंदा स्पर्धेचे



**बारामती :** मुख्याधिकारी महेश रोकडे यांचा सत्कार करताना अनेकांतचे अध्यक्ष जवाहर वाघोलीकर.

सुवर्णमहोत्सवी वर्ष आहे. या प्रसंगी मुख्याधिकारी रोकडे यांनी वाचन संस्कृती लोप पावत चाललेल्या डिजिटल युगामध्ये वक्तृत्वाचा ठेवा अखंडितपणे ५० वर्षे जपल्याबद्दल संस्थेच्या पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले.

तसेच, जवाहर शाह यांनी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाण व नेतृत्वगुण विकसित होण्यासाठी वक्तृत्व व वादविवाद स्पर्धा अत्यंत मोलाची असल्याचे नमूद केले.

महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून अनेक विद्यार्थी या स्पर्धेकरिता सहभागी झाले असून, स्पर्धेच्या पहिल्या दिवशी कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालय गटामध्ये वक्तृत्व स्पर्धा होणार आहेत. तर, दुसऱ्या दिवशी वादविवाद स्पर्धा व उत्स्फूर्त स्पर्धा होत आहे.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांनी स्वागत केले. स्पर्धेचे कार्याध्यक्ष कृष्णा कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केले. उपप्राचार्य डॉ. सचिन गाडेकर यांनी आभार मानले, प्रणीत वाबळे व स्नेहल कदम यांनी सूत्रसंचालन केले.

दै पुढारी



# टी. सी.च्या डॉ. गौतम जाधव यांचा आयकेएफ लेव्हल ३ कोर्स पूर्ण

**बारामती : पुढारी वृत्तसेवा**



आंतरराष्ट्रीय कॉर्फबॉल असोसिएशन व कॉर्फबॉल असोसिएशन ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कॉर्फबॉल या खेळाचा लेव्हल ३ हा आंतरराष्ट्रीय मार्गदर्शक होण्यासाठीचा कोर्स भारतीय कॉर्फबॉल महासंघाने लव्हली प्रोफेशनल युनिव्हर्सिटी (फगवारा, पंजाब) या ठिकाणी दि. १९ ते २२ सप्टेंबर २०२३ दरम्यान आयोजित केला होता. या कोर्ससाठी महाराष्ट्र कॉर्फबॉल संघटनेकडून येथील टी. सी. महाविद्यालयातील डॉ. गौतम जाधव यांची निवड झाली होती. त्यांनी तो यशस्वीरीत्या पूर्ण केला.

या कोर्ससाठी आशिया खंडातून १२ प्रशिक्षक सहभागी झाले होते. आयकेएफ इन्स्ट्रक्टर जॉर्ज एल्विस व यान यॉर्क या नेदरलँडच्या कोर्स डायरेक्टरच्या मार्गदर्शनाखाली हा कोर्स पार पडला. या चार दिवसांत सकाळ व सायंकाळ या सत्रात प्रात्यक्षिक व दुपार सत्रात लेखी कार्य पूर्ण करून घेण्यात आले. कॉर्फबॉल या खेळाचा लेव्हल ३ हा आंतरराष्ट्रीय मार्गदर्शक कोर्स पूर्ण करणारे डॉ. गौतम जाधव हे महाराष्ट्रातून पहिलेच कोच ठरलेले आहेत. यापूर्वी त्यांनी व्हॉलिबॉल व कॉर्फबॉल खेळातील लेव्हल १ व लेव्हल २ आंतरराष्ट्रीय मार्गदर्शक कोर्स पूर्ण केलेले आहेत. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष जवाहर शाह वाघोलीकर, सचिव मिलिंद शाह वाघोलीकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश जगताप, सर्व उपप्राचार्य, रजिस्ट्रार, प्राध्यापक, विद्यार्थी व विद्यार्थिनी यांनी डॉ. जाधव यांचे अभिनंदन केले आहे.

सकाळ ८/१०/२३ पान ८



# पंकज पांडुळे 'मोरोपंत वक्तृत्व स्पर्धे'चा विजेता

बारामती, ता. ७ : बारामती नगरपालिका आणि तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय यांच्या वतीने आयोजित कविवर्य मोरोपंत वादविवाद आणि वक्तृत्व स्पर्धेत यंदा मुंबईच्या बी. के. बिर्ला महाविद्यालयाच्या पंकज पंढरीनाथ पांडुळेने विजेतेपद प्राप्त केले. याच महाविद्यालयाच्या यश रवींद्र पाटील आणि पंकज पांडुळे यांच्या संघाने वादविवाद स्पर्धेचेही विजेतेपद पटकाविले.

प्रसिद्ध गायक डॉ. गणेश चंदनशिवे यांच्या हस्ते विजेत्यांना पारितोषिके प्रदान करण्यात आली. संस्थेचे सदस्य विकास शहा (लेंगरेकर) अध्यक्षस्थानी होते. वक्तृत्व स्पर्धेतील मोरोपंत विषयातील वरिष्ठ विभागामध्ये मोरोपंत विषयात प्रथम क्रमांक तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या जयराम प्रकाश पिंगळे याने तर कनिष्ठ विभागामध्ये समृद्धी धनंजय नीळने प्रथम क्रमांक पटकविला.



बारामती : कविवर्य मोरोपंत वादविवाद स्पर्धेतील विजेते यश पाटील, पंकज पांडुळे यांना पारितोषिक देताना डॉ. गणेश चंदनशिवे, विकास लेंगरेकर आणि इतर मान्यवर.

स्पर्धेचा निकाल - कनिष्ठ महाविद्यालय - वक्तृत्व स्पर्धा - प्रथम क्रमांक श्रद्धा सुरेश अहिनवे (शारदाबाई पवार महिला महाविद्यालय, बारामती), द्वितीय समृद्धी धनंजय नीळ (तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती), वरिष्ठ महाविद्यालय - वक्तृत्व स्पर्धा - प्रथम - पंकज पंढरीनाथ पांडुळे, द्वितीय - जयराम प्रकाश पिंगळे (तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती), वादविवाद स्पर्धा - प्रथम - संघ बी. के. बिर्ला महाविद्यालय, मुंबई (स्पर्धक - पंकज पंढरीनाथ पांडुळे आणि यश रवींद्र पाटील) द्वितीय - संघ न्यू आर्ट्स, कॉमर्स, सायन्स महाविद्यालय, नगर (स्पर्धक - महेश जनार्दन उशीर आणि आकाश दत्तात्रेय मोहिते), उत्स्फूर्त वक्तृत्व स्पर्धा - प्रथम - यश रवींद्र पाटील, द्वितीय क्रमांक - मुग्धा अमित थोरात (फर्ग्युसन महाविद्यालय, पुणे)

५ व ६ ऑक्टोबर रोजी कविवर्य मोरोपंत आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व आणि वादविवाद स्पर्धेचे आयोजन केले आहे. वरिष्ठ आणि कनिष्ठ महाविद्यालय अशा दोन विभागांमध्ये ही स्पर्धा पार पडली. या स्पर्धेचे यंदाचे सुवर्णमहोत्सवी वर्ष आहे.

डॉ. गणेश चंदनशिवे यांनी आपल्या शाहिरी व गोंधळाद्वारे सादरीकरण केले. महाराष्ट्रातील विविध महाविद्यालयातील ८७ स्पर्धकांनी स्पर्धेत सहभाग नोंदवला. डॉ. विलास बुवा, मानाजी गावडे, विवेक पांढकर, राजकुमार कदम, गोरखनाथ लडकत, डॉ. जया कदम यांनी केले. प्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांनी स्वागत केले. कृष्णा कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केले. स्नेहल कदम आणि ऋतुजा आगम यांनी सूत्रसंचालन तर डॉ. सीमा नाईक गोसावी यांनी आभार मानले.

सकाळ ८/१०/२३ ८

## संख्याशास्त्रात करिअरच्या संधी : काकडे

बारामती : "संख्याशास्त्र विषयात करियरच्या अनेक संधी आहेत. शासनाच्या अर्थ आणि सांख्यिकी या विभागामध्ये करियरच्या अनेक संधी असून विद्यार्थींनी पारंपरिक विषयापेक्षा संख्याशास्त्राकडे वळले पाहिजे," असे मत विकास काकडे यांनी व्यक्त केले. ते रयत शिक्षण संस्थेच्या आर. एन. आगरवाल टेक्निकल विद्यालय येथे टीसी महाविद्यालयात संख्याशास्त्र आणि करिअर या विषयावरील व्याख्यानात बोलत होते. या वेळी पाचवी ते दहावीचे विद्यार्थी उपस्थित होते. अरविंद मोहिते यांनी प्रास्ताविक, निवास सणस यांनी परिचय करून दिला. या वेळी प्राचार्य पोपट मोरे, उपमुख्याध्यापक के. डी. देवडे उपस्थित होते.

दै. पुढारी दि. २०/१/२३ पान ६

# टी. सी. महाविद्यालयातील १९ खेळाडूंना शिष्यवृत्ती

**बारामती : पुढारी वृत्तसेवा**

अनेकान्त एज्युकेशन सोसायटीच्या तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील १९ खेळाडूंना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून दीड लाखाची शिष्यवृत्ती देण्यात आली.

विद्यापीठ, क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाच्या वतीने शैक्षणिक वर्ष २००७-०८ पासून विविध क्रीडा स्पर्धांमध्ये विशेष नैपुण्य प्राप्त केलेल्या खेळाडूंना दर वर्षी क्रीडा शिष्यवृत्ती देण्यात येते. शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करिता तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील १९ खेळाडूंना ही शिष्यवृत्ती मिळाली. अखिल भारतीय आंतरविद्यापीठ व तिसऱ्या खेलो इंडिया विद्यापीठ स्पर्धेत प्रतिनिधित्व करणाऱ्या सांघिक क्रीडाप्रकारात विशेष नैपुण्यप्राप्त प्रथम, व्दितीय, तृतीय क्रमांक संपादन केलेल्या विविध संघांतील खेळाडूंना तसेच राज्यपाल यांच्या प्रेरणेने आयोजित कृषी व अकृषी विद्यापीठअंतर्गत २४ व्या क्रीडा महोत्सव स्पर्धांमध्ये प्रथम, व्दितीय, तृतीय क्रमांक संपादन केलेल्या विविध संघांतील खेळाडूंना ही शिष्यवृत्ती दिली जाते.

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून शिष्यवृत्ती**

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करिता तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील १९ खेळाडूंना तब्बल एकूण दीड लाखाहून अधिक रक्कम प्राप्त झाली आहे. या शिष्यवृत्तीमुळे खेळाडूंना खेळासाठी प्रोत्साहन मिळेल आणि शिक्षणासाठी फायदा होईल, असे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांनी सांगितले.

खेळाडूंच्या यशामध्ये क्रीडाशिक्षक म्हणून जिमखाना विभागाचे विभागप्रमुख डॉ. गौतम जाधव आणि प्रा. अशोक देवकर यांचे विशेष योगदान आहे.

अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष जवाहर शाह वाघोलीकर, सचिव मिलिंद शाह वाघोलीकर, संस्थेचे सर्व सदस्य, महाविद्यालयाचे रजिस्ट्रार, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी सर्व खेळाडूंचे अभिनंदन केले.

पुढारी २०/१/२३ ६

दै. लोकमत २६/९/२३ ५/०७/८

# स्थलांतरित बसस्थानक-टीसी महाविद्यालय बससेवा सुरू

२६/९/२३ ८

लोकमत न्यूज नेटवर्क

बारामती : बारामती येथील स्थलांतरित बसस्थानक ते तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या प्रवासादरम्यान विद्यार्थ्यांची गैरसोय होत होती. हे टाळण्यासाठी बससेवा सुरू करण्याची मागणी गेल्या दोन वर्षांपासून विद्यार्थ्यांकडून होती. या मागणीला यश आले असून स्थलांतरित बसस्थानक ते टिसी कॉलेज अशी बससेवा महामंडळाने सुरू केली आहे.

यावेळी बारामती सहकारी बँकेचे अध्यक्ष सचिन सातव, माजी नगराध्यक्षा पौर्णिमा तावरे, योगेश नालंदे, प्राचार्य डॉ. अविनाश जगताप, उपप्राचार्य डॉ.सचिन गाडेकर, डॉ. अशोक काळंगे, डॉ.योगिनी मुळे, डॉ. सीमा नाईक गोसावी, डॉ. रामचंद्र सपकाळ, रजिस्ट्रार अभिनंदन शहा, डॉ. संजय काळे, शुभम सावंत यांच्या उपस्थितीत बसचे पूजन झाले. बससेवा सुरू करण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष जवाहर शाह वाघोलीकर, मिलिंद शाह यांचे सहकार्य मिळाले. स्वीय सहायक हनुमंत पाटील, तालुकाध्यक्ष संभाजी होळकर, जिल्हा उपाध्यक्ष प्रताप पागळे यांचे सहकार्य लाभले.

## गैरसोय झाली दूर

बसस्थानक ते महाविद्यालयाचे अंतर चार ते पाच किलोमीटर असून पायी येणाऱ्या विद्यार्थ्यांना हे अंतर लांब असल्यामुळे त्यांची गैरसोय होत होती. संस्थेच्या मार्गदर्शनाखाली प्रीतम गुळूमकर आणि शुभम सावंत यांनी सातत्याने पाठपुरवठा केला.

दै. सकाळ
दि. २६/९/२३ ८

# स्वरंग २०२३ युवा महोत्सवाचे आयोजन

बारामती, ता. २५ : तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ विद्यार्थी विकास मंडळांतर्गत 'स्वरंग २०२३ युवा महोत्सवा'चे आयोजन शुक्रवारी (ता. २९) केल्याची माहिती प्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांनी दिली.

यामध्ये सुगम गीत, समूह गायन, शास्त्रीय गायन, लोकनृत्य, शास्त्रीय नृत्य, एकपात्री प्रयोग, एकांकिका, नाटक, रांगोळी, व्यंगचित्र, मेहंदी, वक्तृत्व, वादविवाद अशा स्पर्धा होणार आहेत. स्पर्धेत २१ महाविद्यालये सहभागी होणार असून ६५० हून अधिक विद्यार्थ्यांनी आपापल्या महाविद्यालयांमार्फत नावनोंदणी केली आहे.

सकाळ २६/९/२३ ८

दै. पुढारी ०६।०९।२३ पान २

# टी. सी.च्या पोमणेची भारतीय संघात निवड

०६।०९।२३

बारामती : पुढारी वृत्तसेवा

तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाचा विद्यार्थी प्रणव पोमणे याची तायपे येथे होणाऱ्या जागतिक कॉर्फबॉल अजिंक्यपद स्पर्धेसाठी भारतीय संघात निवड झाली आहे.

चायनीज तायपे येथे १७ ते ३१ ऑक्टोबरदरम्यान होणाऱ्या आयकेएफ जागतिक अजिंक्यपद कॉर्फबॉल स्पर्धेसाठी तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाचा एम. कॉम. भाग १ चा विद्यार्थी पोमणे याची भारतीय संघात निवड झाली आहे.

प्रणव हा इयत्ता ११ वी पासून तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात शिक्षण घेत असून, सुरुवातीपासूनच जिद्द, चिकाटी व मेहनतीच्या जोरावर त्याने सलग दुसऱ्यांदा भारतीय संघात आपले स्थान मिळविले आहे. प्रणव हा फलटण तालुक्यातील खटकेवस्ती, गोखळी या ठिकाणचा मूळचा रहिवासी आहे. प्रणवला स्पर्धेसाठी संस्था व महाविद्यालयातर्फे ५० हजार रुपयांचे आर्थिक साह्य संस्थेचे ज्येष्ठ सदस्य विकास शहा लेंगरेकर यांनी केले. प्रणवला जिमखाना विभागप्रमुख डॉ. गौतम जाधव व प्रा. अशोक देवकर यांचे मार्गदर्शन लाभले. प्रणवच्या निवडीबद्दल संस्थेचे अध्यक्ष जवाहर शाह वाघोलीकर, सचिव मिलिंद शाह वाघोलीकर, ज्येष्ठ सदस्य विकास शहा लेंगरेकर, प्राचार्य डॉ. अविनाश जगताप, उपप्राचार्य, रजिस्ट्रार, सर्व प्राध्यापक, शिक्षक व विद्यार्थी-विद्यार्थिनींनी अभिनंदन केले.